## संपादकीय

### बेरोजगार युवकांची हेळसांड

सध्या युवकांची विविध पातळ्यांवर चांगलीच हालअपेष्टा सुरू आहेत. बेरोजगारीचा दर पन्नास वर्षांच्या पातळीवर गेला आहे. विविध निवड मंडळांचे गैरकारभार, पेपर फुटीची प्रकरणे, निवड परीक्षातील गोंधळ अशा सगळ्या ठिकठिकाणी गोंधळाच्या बातम्या नियमित येत असतात. बेरोजगार परीक्षार्थी युवकांची ही जी हेळसांड सुरू आहे, त्यात महाराष्ट्राने तर कहरच केला आहे. महाराष्ट्रात, महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या निवड प्रक्रियेतील, पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा आणि मुलाखती आदी सोपस्कार उरकून निवड यादी जाहीर होऊनही तब्बल एक वर्षाहून अधिक काळ या उमेदवारांना राज्य सरकारच्या नोकरीची नियुक्तीपत्रेच मिळालेली नाहीत.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२८० | रविवार, दि.२ फेब्रुवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये





## अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी मोठ्या घोषणा

# किसान क्रेडिट कार्डची मर्यादा तीन लाखांहून पाच लाखांवर

### प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेतून एक कोटी सत्तर लाख शेतकऱ्यांना होणार फायदा

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**मोदी सरकारने या अर्थसंकल्पातून शेतकऱ्यांना झुकते माप दिल्याचे पाहायला मिळत आहे. यंदा अर्थमंत्र्यांनी शेतकऱ्यांसाठी नव्या योजनेची घोषणा केली आहे. आता एक कोटी सत्तर लाख शेतकऱ्यांना प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेचा फायदा होणार आहे. दरम्यान, १०० जिल्ह्यांसाठी धनधान्य कृषी योजना राबवण्यात येणार आहे.**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी संसदेत शनिवारी दि. १ फेब्रुवारी रोजी देशाचा अर्थसंकल्प सादर केला. निर्मला सीतारामण यांनी सलग आठव्यांदा अर्थसंकल्प सादर करताना सर्वसामान्यांना दिलासा देत शेतकऱ्यांसाठी विविध फायद्याच्या योजना जाहीर केल्या आहेत. यामध्ये राज्यांच्या सहाय्याने प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेला बळकटी देण्यात येईल. किसान क्रेडिट कार्डची तीन लाखांची मर्यादा पाच लाखांवर



करण्यात आली आहे. डाळींचे उत्पादन वाढवण्यासाठी आत्मनिर्भरता मिशन राबवण्यात येईल. तूर, उडीद आणि मसूर डाळींच्या ◀◀ पान २ वर

### १४० कोटी भारतीयांच्या आकांक्षांचा अर्थसंकल्प – पीएम मोदी

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेला अर्थसंकल्प १४० कोटी भारतीयांच्या आकांक्षांचा आणि प्रत्येक भारतीयाचे स्वप्न पूर्ण करणारा आहे, अशी प्रतिक्रिया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी सादर झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्पावर दिली. पंतप्रधान मोदी म्हणाले की, हा जनतेचा अर्थसंकल्प आहे. भारताच्या विकासामध्ये हा दिवस एक महत्त्वाचा टप्पा आहे. १४० कोटी भारतीयांच्या आकांक्षांचा हा अर्थसंकल्प आहे. प्रत्येक भारतीयाची स्वप्ने पूर्ण करणारे बजेट आहे. तरुणांसाठी अनेक क्षेत्रे खुली केली आहेत. हे विकसित भारताच्या ध्येयाला चालना देणारे एक शक्ती गुणक बजेट आहे. आजच्या अर्थसंकल्पाने भारतात गुंतवणुकीला, पर्यटनाला चालना मिळेल. अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी झालेल्या घोषणा कृषी क्षेत्र आणि ग्रामीण भागात क्रांती घडवेल, असा विश्वास मोदी यांनी व्यक्त केला.

### ही तर वैचारिक दिवाळखोरी, बुलेटच्या जखमेवर मलमपट्टी – राहुल गांधी

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले की, बंदुकीच्या गोळीने झालेल्या जखमेवर मलमपट्टी केल्यासारखा हा अर्थसंकल्प आहे. राहुल गांधी यांनी म्हटले की, जागतिक अनिश्चततेत आर्थिक संकटावर मात करण्यासाठी एका चांगल्या बदलाची आवश्यकता होती. पण हे सरकार विचारांनी दिवाळखोर आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात अर्थव्यवस्थेतील संकटांवर काहीही उपाय नाहीत. त्याऐवजी यावर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीमुळे बिहारसाठी अनेक घोषणा केल्या आहेत. पक्षाचे सचिव जयराम रमेश यांनीही म्हटले की, फक्त करदात्यांना दिलासा दिला आहे. अर्थव्यवस्थेवर प्रत्यक्षात याचा काय परिणाम होईल हे बघावं लागेल. अर्थव्यवस्था सध्या मजुरी, सार्वजनिक वापर, खासगी गुंतवणुकीचं प्रमाण आणि किचकट जीएसटी प्रणाली यामुळे संकटांनी घेरलेली आहे. अर्थसंकल्पात या समस्यांवर कोणताच उपाय नाही.

### शेतकरी कर्जमाफी, हमीभावाला स्थान नसलेला अर्थसंकल्प – नाना पटोले

महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या सर्वात जास्त आत्महत्या होत आहेत. शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी अशी मागणी होत असताना भाजप सरकारने कर्जमाफीची घोषणा केली नाही. या बजेटने शेतकरी, व्यापारी व सामान्य नागरिकांचा भ्रमनिरास केला आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली नाही आणि शेतमालाच्या हमीभावाबद्दलही एक शब्दही काढला नाही. केंद्रीय अर्थसंकल्प फक्त आकड्यांचा भुलभुलैया व गोलमाल आहे. अशी टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली.

### गंभीर आजारांचे ३६ औषधे स्वस्त होणार

या अर्थसंकल्पातून सरकारने अनेक मोठ्या घोषणा केल्या आहेत. केंद्र सरकारने बजेटमधून गोरगरीबांना दिलासा देण्याचं काम केलं आहे. तसेच रुग्णांसाठी केंद्र सरकारने आपले हात मोकळे केले आहेत. केंद्र सरकारने एक दोन नव्हे तर गंभीर आजारावरील ३६ औषधे ड्युटी फ्रि केली आहेत. त्यामुळे ही औषधे स्वस्तात मिळणार आहेत. सीतारामन यांनी ३६ जीवन रक्षक औषधांचा ड्युटी टॅक्स पूर्णपणे रद्द केला आहे. सर्व सरकारी रुग्णालयात कॅन्सर डे केअर सेंटर बनवण्याचा निर्णयही केंद्र सरकारने घेतला आहे. कॅन्सरवरील उपचारासाठीची औषधे आता स्वस्त होणार आहेत. सहा जीवन रक्षक औषधांवरील कस्टम ड्युटी ५ टक्के करण्यात आली आहे.

### हा अर्थसंकल्प ग्रामीण भारताचा चेहरामोहरा बदलणारा–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

ग्रामीण भारताचा चेहरामोहरा बदलणारा आणि नागरिककेंद्रीत गुंतवणुकीला प्रोत्साहन देणारा हा अर्थसंकल्प आहे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज माध्यमांशी बोलताना व्यक्त केली. केंद्रीय अर्थसंकल्प विकसित भारताच्या दिशेने नेणारा, सर्वसमावेशक आणि विकसित भारताचा ऐतिहासिक अर्थसंकल्प आहे. हा अर्थसंकल्प अर्थव्यवस्थेला अधिक प्रगल्भ करणारा ठरेल. अर्थव्यवस्थेला आणखी सदृढ करणारा, मध्यमवर्गीय, पगारदार, युवा आणि शेतकरी, कष्टकरी या सगळ्यांना दिलासा देणारा आहे. या अर्थसंकल्पातील तरतुदींमुळे महाराष्ट्राच्या अनेक महत्वाकांक्षी धोरणांना बळ मिळेल. विशेषत: महाराष्ट्र हे स्टार्टअपचे कॅपिटल असल्याने नवीन धोरणांचा मोठा लाभ मिळेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### रुपया कसा येणार ?

एक रुपयाच्या उत्पन्नापैकी जास्तीत जास्त २४ पैसे कर्ज आणि इतर दायित्वांमधून येणार आहेत. यानंतर, २२ पैसे आयकरातून, १८ पैसे जीएसटी आणि इतर करांमधून, १७ पैसे कॉर्पोरेट करातून, ९ पैसे कर सोडून इतर प्राप्तीतून, ५ पैसे केंद्रीय उत्पादन शुल्कातून, ४ पैसे सीमा शुल्कातून आणि १ पैसा कर्ज नसलेल्या भांडवली पावत्यांमधून येणार आहे.

### रुपया कसा जाणार ?

१ रुपयांच्या उत्पन्नापैकी सरकार राज्यांना कर आणि शुल्कात त्यांचा वाटा म्हणून २२ पैसे देणार. याशिवाय, २० पैसे व्याज भरण्यासाठी, १६ पैसे केंद्रीय क्षेत्र योजनेसाठी (भांडवली खर्च आणि संरक्षणावरील अनुदान वगळून), ८ पैसे संरक्षणासाठी, ८ पैसे वित्त आयोग आणि इतर हस्तांतरणांसाठी, ८ पैसे केंद्रीय योजनेसाठी, ४ पैसे पेन्शनसाठी, ६ पैसे अनुदानासाठी आणि इतर बाबींसाठी ८ पैसे.

### हे स्वस्त होणार :

कॅन्सरची ३६ औषधे, वैद्यकीय उपकरणे, भारतात बनवलेले कपडे, मोबाईल फोन, बॅटरी, लेदर जॅकेट, शूज, बेल्ट, पाकीट, ईव्ही वाहने, एलसीडी, एलईडी टीव्ही, हँडलूम कपडे, अत्यावश्यक खनिजे, जहाजबांधणी.

### हे महागणार :

विणलेले कापड, फ्लॅट पॅनेल डिस्प्ले.

### १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न आयकर मुक्त

सरकारने मध्यमवर्गींना सर्वात मोठी भेट दिली आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात आयकर मुक्त उत्पन्नाची मर्यादा पाच लाखांनी वाढवण्यात आली आहे. गेल्या २० वर्षांत एका लाखांपासून १२ लाखांपर्यंतचे उत्पन्न आयकरमुक्त झाले आहे. आता १२ लाख रुपयांच्या वार्षिक उत्पन्नावर कोणताही कर भरण्याची गरज नाही. नवीन करप्रणाली अंतर्गत हा बदल करण्यात आला आहे. यापूर्वी ७ लाख रुपयांच्या कमाईवर कोणताही कर भरावा लागत नव्हता. स्टँडर्ड डिडक्शन फक्त ७५००० रुपये ठेवण्यात आले आहे.

### महाराष्ट्राचा अर्थसंकल्प या तारखेला होणार सादर? अजित पवारांनी

मुंबई । प्रतिनिधी



**देशाचा अर्थसंकल्प सादर झाला असून, आता महाराष्ट्राचा अर्थसंकल्प कधी सादर होणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार हे यंदाचा अर्थसंकल्प मांडणार आहेत. मार्चच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात अर्थसंकल्प मांडला जाण्याचे संकेत अजित पवार यांनी दिले आहेत.**

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, मार्चच्या पहिल्या आठवड्यात किंवा दुसऱ्या आठवड्यात राज्याचा अर्थसंकल्प सादर करणार आहे. माझा शेतकरी वर्ग आणि सर्वसामान्य नागरिक यांचा विचार करून अर्थसंकल्प मांडणार आहे. तसेच लाडक्या बहिणींचाही या अर्थसंकल्पात विचार केला ◀◀ पान २ वर

### पंकजा मुंडेंनी नामदेव शास्त्रींच्या भुमिकेवर बोलणे टाळले

#### धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यावर फडणवीस, पवारांनी आधीच सांगितले–पंकजा मुंडे

बीड । प्रतिनिधी

**भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री यांनी धनंजय मुंडेंची पाठराखण करीत काही प्रश्न उपस्थित केले होते. त्यानंतर त्यांच्या भुमिकेवरुन सोशल मिडीयावर त्यांना ट्रोल करण्यात आले. राजकीय नेत्यांनीही प्रतिक्रिया देत प्रश्न उपस्थित केला. पंकजा मुंडे यांनी मात्र नामदेव शास्त्रींच्या भुमिकेवर बोलणे टाळले असले तरी धनंजय मुंडे यांची मात्र त्यांनी बाजू घेतली आहे.**



मंत्री धनंजय मुंडे यांनी भगवान गडावर मुक्काम केला. त्यानंतर महंत नामदेव शास्त्री यांनी आपली भुमिका मांडत धनंजय मुंडे यांची पाठराखण केली. त्यावर त्यांच्यावर चोहूबाजूने टिका होत आहे. दरम्यान, यावर माध्यमांनी पंकजा मुंडे यांना सवाल केला असता त्यांनी स्पष्टच प्रतिक्रिया दिली. नामदेव शास्त्री यांच्यावर प्रतिक्रिया द्यायची मला गरज वाटत नाही, असे वक्तव्य भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी केले आहे. तर धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याच्या दबावावर सवाल केला असताना पंकजा मुंडे यांनी प्रतिसवाल केल्याचे पाहायला मिळाले. 'दबाव कुठे आहे? स्वतः राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीड प्रकरणात संबंध आढळला तर योग्य ती कारवाई करू, संबंध नसेल तर ◀◀ पान २ वर

### छत्तीसगडमध्ये चकमक; ८ नक्षलवादी ठार

गंगालूर । वृत्तसंस्था

छत्तीसगडच्या गंगालूरमध्ये पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या चमकमकीत ८ नक्षलवाद्यांना ठार करण्यात आले आहे. गंगालूरमध्ये नक्षली दबा धरून बसल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यावरून पोलिसांनी ही कारवाई केली. गंगालूरमध्ये पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये सकाळपासून चकमक सुरू होती. यामध्ये ८ नक्षलवादी ठार झाले आहेत.

डीआरजी, एसटीएफ, कोबरा, सीआरपीएफ २२२ यांची संयुक्त टीम नक्षलविरोधी अभियान राबवित असताना ही चकमक झाली. सदर क्षेत्रात नक्षल दबा धरून बसले असल्याची माहिती मिळाली होती. ज्वाइंट ऑपरेशनने सकाळ पासूनच पोलीस आणि नक्षल यांच्यात चकमक सुरु होती. यामध्ये ८ नक्षली मारले गेले व अन्य सामग्री हस्तगत करण्यात आली असल्याची माहिती समोर आली आहे.










## अग्रलेख

# बेरोजगार युवकांची हेळसांड

सध्या युवकांची विविध पातळ्यांवर चांगलीच हालअपेष्टा सुरू आहेत. बेरोजगारीचा दर पन्नास वर्षांच्या पातळीवर गेला आहे. विविध निवड मंडळांचे गैरकारभार, पेपर फुटीची प्रकरणे, निवड परीक्षातील गोंधळ अशा सगळ्या ठिकठिकाणी गोंधळाच्या बातम्या नियमित येत असतात. बेरोजगार परीक्षार्थी युवकांची ही जी हेळसांड सुरू आहे, त्यात महाराष्ट्राने तर कहरच केला आहे. महाराष्ट्रात, महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या निवड प्रक्रियेतील, पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा आणि मुलाखती आदी सोपस्कार उरकून निवड यादी जाहीर होऊनही तब्बल एक वर्षाहून अधिक काळ या उमेदवारांना राज्य सरकारच्या नोकरीची नियुक्तीपत्रेच मिळालेली नाहीत.

युवकांच्या सहनशीलतेची ही परिसीमा आहे. याप्रकरणी निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन त्यांच्याकडे हा विषय उपस्थित केला आहे. त्याला मुख्यमंत्र्यांनी लवकर न्याय देण्याची भूमिका घेतली आहे. पण खरं म्हणजे हा जो नियुक्त्यांमधील अक्षम्य विलंब झाला त्याला जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करायला हवी. नुसत्या नियुक्त्या देऊन हा विषय संपणार नाही. मुळात युवकांची अशी अक्षम्य हेळसाड होऊ नये याची दक्षता सर्वच पातळ्यांवर घ्यायला हवी. महाराष्ट्रात राज्य लोकसेवा आयोगाकडून विविध पातळीवरील सरकारी भरतीसाठी निवड झालेल्या उमेदवारांची संख्या ६२३ आहे. गेली सुमारे दोन अडीच वर्ष हे भरती नाटक सुरू आहे. पण त्याचा अंतिम निर्णय अजून लागलेला नाही. या उमेदवारांच्या भरतीसाठी ऑगस्ट २०२२ मध्ये राज्यसेवा आयोगाने पूर्व परीक्षा घेतली. जानेवारी २०२३ मध्ये मुख्य परीक्षा झाली. त्यानंतर डिसेंबर २०२३ आणि जानेवारी २०२४ मध्ये मुलाखती झाल्या. १८ जानेवारी रोजी गुणवत्ता यादी प्रसिद्ध झाली आणि २० मार्च २०२४ रोजी तात्पुरती निवड यादीसुद्धा प्रसिद्ध झाली. पण आता २०२५ सालचा मार्च महिना उजाडण्याची वेळ आली आहे, तरीही इतक्या प्रदीर्घ प्रक्रियेनंतरही निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपत्रे मिळालेली नाहीत.

आपली सरकारी अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्याचा आनंद व्यक्त करणारी मुले आणि त्यांचे पालक गेले वर्षभर प्रत्यक्षात नियुक्तीपत्र कधी मिळते याची वाट पाहात आहेत. सरकारी अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्यानंतर अनेक मुलांनी आणि पालकांनी पेढे वाटले; पण अजूनही ही मुले घरातच बेरोजगार बसून राहिली असल्याने त्यांची कुचेष्टा सुरू झाली आहे. ही मानहानी आणि कुचेष्टा सहन करणाऱ्या युवकांच्या सहनशीलतेचा आता अंत होऊ पाहात आहे. यासंदर्भात माध्यमांमध्ये बातम्याही येऊन गेल्या. शेवटी हे प्रकरण आपल्याच अंगलट येण्याची शक्यता दिसल्यानंतर सामान्य प्रशासन विभागाने याचे खापर न्यायालयीन यंत्रणेवर फोडण्याचा प्रकार केला आहे.

निवड झालेल्या उमेदवारांची विविध बाबतीत पडताळणी केली जाते. त्यात चारित्र्य पडताळणी, जातवैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, आर्थिक दुर्बल घटक प्रमाणपत्र, क्रीडा प्रमाणपत्र आदींची पडताळणी करण्याचे आदेश गेल्या वर्षी २० डिसेंबर रोजी देण्यात आले. पण अजूनही पडताळणी प्रक्रिया सुरूच आहे. या विलंबामुळेच निवड झालेल्या उमेदवारांना प्रत्यक्ष नियुक्ती देता आलेली नाही, असे सरकारचा सामान्य प्रशासन विभाग सांगत आहे. सामान्य प्रशासन विभागाचे हे काम होते की, निवड झालेल्या उमेदवारांची पडताळणी प्रक्रिया कुठवर आली याचा आढावा त्यांनी घ्यायला हवा होता. पण ते फक्त आदेश काढून मोकळे झाले. पुढच्या प्रक्रियेकडे त्यांनी लक्ष दिले नाही. आणि इकडे निवड झालेले हे शेकडो युवक मात्र प्रत्येक दिवस नियुक्तीपत्र मिळण्याची वाट पाहात राहिले. राज्य सरकारने आणि एकूणच केंद्र सरकारनेही लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या या भरती परीक्षांच्या संदर्भात खडबडून जागे होऊन युवकांची या पुढील काळात कोणत्याच पातळीवर हेळसांड होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. अन्यथा युवकांचा असंतोष झेलणे सरकारला महागात पडेल. नवीन नोकर भरतीसाठीची सरकारची गरज आणि क्षमता लक्षात घेऊन लोकसेवा आयोगामार्फत भरती परीक्षा घेण्याचे नियोजन केले पाहिजे. लोकसेवा आयोगालाही ही प्रक्रिया वेळेत आणि विनाविलंब पूर्ण करण्याबाबतची तंबी देण्याचीही गरज आहे.

---

## ढाण्या वाघ...

बीड जिल्ह्याचा एकच
तो आण्णा ढाण्या वाघ,
सज्जनांचं करी समर्थन
अन्? दुर्जनांचा राग.
दीन दुबळ्यांसाठी
तो रात्रंदिवस फिरला,
संस्था ना कारखाने
तरी तो लोकप्रिय ठरला.
ऊसतोड मजूर व मुकादमांच्या
भल्यासाठी तो झटला,
महाराष्ट्रवासीयांना त्याचा
फार अभिमान वाटला.
इथल्या जलक्रांतीसाठी
त्याने दगडगोटे झेलले,
विरोधकांसह लोकंही
तेव्हा वेडंवाकडं बोलले.
अन्याय अत्याचाराविरुद्ध
तो महाराष्ट्रभर फिरला,
दिलखुलास रांगडा गडी
लोकांच्या मनात भरला.
निवडणुकीतही त्याच्यावर
डाव चिडीचे टाकले,
पण त्याच्या सत्कर्मापुढं
गडी सारेच झाकले.
मतदारसंघाचा विकास
हीच त्यांची इच्छा,
उदंड आयुष्य लाभो आण्णा,
याच मनापासून शुभेच्छा...!



**संजय शेळके**
पांढरी ता.आष्टी जि.बीड.
मो.९९७५२२८५८५

---

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.३१ जानेवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १.०० क्विंटल | २,८५१ | २,८५१ | २,८५१ |
| ज्वारी/हायब्रिड :१६.५० क्विंटल | १,९५० | २,३६० | २,१३५ |
| मका/लोकल:१५.५० क्विंटल | २,१०३ | २,१०३ | २,१०३ |
| तूर : २०६.५० क्विंटल | ६,७३६ | ७,२२२ | ७,०४२ |
| उडीद : ८.०० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: ३.५० क्विंटल | २,४६८ | २,४६८ | २,४६८ |
| मुग : २.५० क्विंटल | ७,१४० | ७,२०० | ७,१७० |
| सोयाबीन: ११९.५० क्विंटल | ३,८०० | ४,०५० | ३,९४१ |
| हरभरा: १५.५० क्विंटल | ४,८०१ | ५,५०१ | ५,१५१ |

---

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग अराजपात्रित पदभरती परीक्षा २ फेब्रुवारी ला होणार

## बीडमध्ये १४ उपकेंद्रावर ४४७९ परीक्षार्थी;१०० मीटर परिघात मनाई आदेश

**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र गट-ब अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ दिनांक २ फेब्रुवारी २०२५ रोजी बीड जिल्हा केंद्रावरील एकूण १४ उपकेंद्रामधून सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० या कालावधीत घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी एकूण ४ हजार ४७९ उमेदवार बसलेले आहेत. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी १४ उपकेंद्रप्रमुख १४ मदतनीस ६५ पर्यवेक्षक २१७ समवेक्षक असे एकूण ३१० अधिकारी, कर्मचारी यांची जिल्हाप्रशासनाद्वारे नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांना दिनांक २८ जानेवारी २०२५ रोजी समाज कल्याणच्या सभागृह बीड येथे निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा केंद्र प्रमुख यांनी परीक्षेच्या अनुषंगाने प्रशिक्षण दिले आहे.**

परीक्षेच्या कालावधीत उपकेंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी परीक्षा उपकेंद्रावर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. तसेच परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेला आहे. आयोगाच्या सूचनेनुसार या परीक्षेसाठी बसलेल्या उमेदवारांना त्यांच्याकडील मोबाईल, पेजर, कॅल्क्युलेटर, इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि अभ्यासाचे इतर साहित्य परीक्षा केंद्रावर घेऊन जाण्यास मनाई आहे. आयोगाने दिलेल्या सूचनेप्रमाणे उमेदवारांना जेवणाचा डबा, अल्पोपहार व पाण्याची बॉटल घेऊन जाण्यास परवानगी देण्यात येत आहे. पेपरच्या वेळेमध्ये उमेदवारांना परीक्षा उपकेंद्राच्या बाहेर जाण्यास मनाई आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने नेमून दिलेल्या परीक्षेचे आवश्यक साहित्यच उमेदवारांना जवळ बाळगण्याची मुभा राहील तसेच सर्व उमेदवारांनी परीक्षेच्या वेळी प्रवेश पत्रासोबत त्यांचे स्वतःच्या आधारकार्ड, निवडणूक आयोगाची ओळखपत्र, पासपोर्ट किंवा ड्रायव्हिंग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी कोणत्याही एका ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे. उमेदवारांना त्यांच्या परीक्षा व उपकेंद्रावर परीक्षेकरिता सकाळी ८.३० वाजता उपस्थित राहावे. सकाळी १०.३० वाजता नंतर परीक्षा केंद्रावर येणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही कारणास्तव प्रवेश देण्यात येणार नाही, असे निवास उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा केंद्र प्रमुख शिवकुमार स्वामी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

---

# महिलांनी कुटुंबाची काळजी घेत स्वत:ची काळजी घ्यावी-तहसिदार वैशाली पाटील

**आष्टी । प्रतिनिधी**

**महिला आपल्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीची काळजी घेते,मात्र स्वतःकडे दुर्लक्ष करते पण असे करून आता चालणार नाही,महिलांनी स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी.स्वतःबरोबरच मुलींच्या आरोग्याचीही काळजी घ्यावी असे प्रतिपादन तहसिलदार वैशाली पाटील यांनी केले आहे.**



आष्टी तहसील कार्यालयात प्रथमच यंदा महिला कर्मचाऱ्यांच्या वतीने हळदी कुंकवाचा कार्यक्रम शुक्रवार (दि.३१)दुपारी ५ वा.घेण्यात आला.त्यावेळी तहसिलदार पाटील बोलत होत्या.या हळदी कुंकवाच्या कार्यक्रमासाठी नायब तहसिलदार अश्विनी पडोळे,अव्वल कारकुन,आश्वनी सोनवणे,अविद्या वीर,महसूल सहाय्यक मनिषा बांगर, तलाठी छाया मेश्राम,नंदा शिंदे,अंकीता जाधव,थेटे एस. बी., भोसले मॅडम,समिक्षा क्षिरसागर,समुध्दी वडगावे,मुसळे मॅडम, इंगवले मॅडम,मीरा नजान,निर्मला धोडे,गयाबाई गर्जे शिपाई,महसुल सेवक सुमित्रा काळे,मनिषा ओटे,शुभागी सुंबरे, पुजा देवळकर,जयश्री काळे,कोमल पिंपळे,दैवशाला गोरे,संगिता चितळे आदि उपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीप प्रज्वलन करून सुरुवात करण्यात आली. यावेळी पुढे बोलतांना तहसिलदार पाटील म्हणाल्या, आपल्या स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे. घरातील कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीची काळजी घेता घेता स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करता कामा नये.आपल्या मुलींनाही दर्जेदार शिक्षण देऊन स्वावलंबी बनण्यासाठी प्रत्येक घरातील आईने पुढाकार घेतला पाहिजे.महिलांच्या बाबतीत कुठे काही घटना घडत असल्यास त्याची माहिती महिलेने जागरूक राहून प्रशासकीय अधिकाऱ्यांना दिली पाहिजे असे त्यांनी सांगितले.या कार्यक्रमानंतर आलेल्या सर्व महिलांना प्रित भोजन देऊन कार्यक्रम संपन्न झाला.

---

# नवगण राजुरी येथील गणेश मंदिरात माघी चतुर्थी निमित्त महाआरती संपन्न

**नवगण राजुरी । प्रतिनिधी**

प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी माघी चतुर्थी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे राजुरी येथील गणेश मंदिरातील माघी उत्सव हा रंगारी समाजातील भाविक मोठ्या उत्साहात साजरा करतात म्हणुन येथील चतुर्थी ला रंगारी चतुर्थी म्हणून ही ओळखले जाते.या उत्सवांसाठी मुळ राजुरी येथील रंगारी समाज बांधव आपल्या सग्यासोयर्यासहित येत असतात गेले चार दिवस द्वारपुजन, ब्राह्मण भोजन,अन्नदान महाआरती असे सर्व कार्यक्रम पार पाडले जातात यावेळी गावातील नागरिक ही



मोठ्या उत्साहात सहभागी होतात यावेळी पुजारी शुभम शिंदे यांनी गणपती गाभारा मध्ये आकर्षक फुलांची रांगोळी काढली दिनांक ४वार मंगळवार फेब्रुवारी रोजी महाआरती, काला,व गणेशाच्या उत्सव मुर्तीची पालखी असे कार्यक्रम करुन उत्सवाची सांगता होईल.

---

# राज्यात तापमान वाढ अन् ढगाळ हवामानाचाही अंदाज

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यातील काही भागात थंडी काहीशी वाढ झाली. मात्र दुपारी उन्हाचा चटका कायम आहे. दोन दिवसांत राज्यात ढगाळ हवामानासह पावसाला पोषक हवामान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे किमान तापमानात वाढ होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.**

उत्तर भारतातील थंडीही कमीजास्त होताना दिसत आहे. पश्चिम राजस्थानात समुद्र सपाटीपासून १.५ किलोमीटर उंचीवर, तसेच दक्षिण केरळमध्ये ९०० मीटर उंचीवर चक्राकार वाऱ्यांच्या स्थिती आहेत. वायव्य भारतात १२.६ किलोमीटर उंचीपर्यंत १३० नॉट्स वेगाने पश्चिमेकडील जोरदार वाऱ्यांचे प्रवाह कायम आहेत. आज पूर्व राजस्थानमधील गंगापूर येथे देशाच्या सपाट भूभागावरील नीचांकी ६.१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. तर राज्यात उत्तरेकडील शीत लहरींचा अभाव, सातत्याने होणारे ढगाळ हवामान यामुळे यंदा थंडीचा कडाका कमी झालेला आहे. यातच उन्हाचा चटका आणि उकाडा वाढल्याचे दिसून येत आहे. तर हवामान विभागाने राज्यात ढगाळ वातावरणासाह काही भागात अगदी किरकोळ पावसाचा अंदाज दिला आहे.

---

# सर्व घटकांना न्याय देणारा परिपूर्ण अर्थसंकल्प

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील नवीन भारताचा नवा नकाशा

### ना.पंकजाताई मुंडे यांनी केले केंद्रीय अर्थसंकल्पाचे स्वागत

मुंबई । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली अर्थमंत्री निर्मला सितारमण यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात देशातील शेतकरी, शेतमजूर, तरूण वर्ग, महिला अशा सर्व समावेशक घटकांचा विचार करण्यात आला आहे. हा अर्थसंकल्प सर्व सामान्य घटकांना न्याय देणारा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील नवीन भारताचा नवा नकाशा समोर ठेवणारा आहे अशी शब्दांत राज्याच्या पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी अर्थसंकल्पाचे स्वागत केले आहे.

अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी प्रधानमंत्री धनधान्य कृषी योजनेची घोषणा करण्यात आली आहे.सरकार ही योजना राज्यांसोबत चालवणार आहे. १.७ कोटी शेतकऱ्यांना मदत मिळणार आहे. याचा देशातील १०० जिल्ह्यांना फायदा होणार आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना ५ लाख रुपयांचे पॅकेज, किसान क्रेडिट कार्डच्या कर्जाची मर्यादा आता ३ लाखांवरून ५ लाख रूपये करण्यात आली आहे. किसान क्रेडिट कार्ड द्वारे ७ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना सुलभ कर्ज सुविधा मिळणार आहे. सर्व जिल्हयामध्ये जिल्हा रूग्णालयात कॅन्सर डे केअर सेंटर, ३६ जीवरक्षक औषधी करमुक्त, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय यासाठी पाच लाख रुपयांपर्यंत कर्ज आदींसाठी यात तरतूद करण्यात आली आहे. अर्थसंकल्पात नव्या करप्रणालीची घोषणा करण्यात आली आहे.त्यानुसार १२ लाख रुपयांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त होणार आहे. त्याचसोबत पुढील सर्व टॅक्स स्लॅब्जमध्येही बदल केले असून त्यानुसार करदात्यांना भराव्या लागणाऱ्या करात सूट मिळाली आहे. त्यामुळे करदात्यांसाठी हा अर्थसंकल्प मोठा दिलासा देणारा आहे. या अर्थसंकल्पामुळे सामान्य माणसाची खर्च करण्याची क्षमता वाढेल. देशाच्या अर्थव्यवस्थेचा विकास दर वाढवणे, सर्वसमावेशक विकास सुनिश्चित करताना खाजगी क्षेत्रातील गुंतवणूक वाढवणे, देशांतर्गत भावना उंचावणे आणि वाढत्या मध्यमवर्गाची खर्च क्षमता वाढवणे या अर्थसंकल्पाचे उद्दिष्ट असल्याचे ना. पंकजाताई यांनी सांगितले.

---

## पान १ वरून...

### किसान क्रेडिट कार्डची मर्यादा तीन

उत्पादनासंदर्भात विशेष लक्ष दिले जाणार आहे. नाफेड, एनसीसीएफकडून डाळींची खरेदी केली जाणार आहे. कापसाचे उत्पादन वाढवण्यावर भर देण्यात येईल. तर कापसाच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी विशेष मिशन राबवण्यात येईल. पूर्व भारतात युरिया प्लांट सुरू करण्यासाठी देखील योजना आखण्यात आली आहे.

--------------

### पंकजा मुंडेंनी नामदेव शास्त्रींच्या

त्या व्यक्तीवर कोणताही अन्याय नको, ही त्यांची भूमिका आहे', असे वक्तव्य करत पंकजा मुंडे यांनी धनंजय मुंडे यांच्या राजीमान्यावर भाष्य केले आहे.

-------------

### महाराष्ट्राचा अर्थसंकल्प या तारखेला

जाणार आहे. तरुण-तरुणींचा विचार करून हा अर्थसंकल्प सादर करण्याचा माझा प्रयत्न असणार आहे. तरुणांना प्रोत्साहन देण्यासाठी कार्यक्रम घेत आहे, असेही अजित पवार म्हणाले.

----------

---

# सर्वसामान्यातून राजकारणामध्ये सर्व जातीला धर्माला सोबत घेऊन दयाला आलेले कार्य कुशल व धुरंदर नेतृत्व आ.सुरेश (आण्णा) धस

आष्टी तालुक्यातील छोट्याशा जामगाव गावांमधे सुमन अक्का व रामचंद्र दादा यांच्या पोटी जन्म घेतलेला सुरेश हा युवक गावचा सरपंच ते महाराष्ट्र राज्याचा आठ खात्याचे मंत्री राहिलेले एकंदर नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते दोन फेब्रुवारी हा त्यांचा जन्मदिवस हा जन्मदिवस आष्टी मतदार संघातील जनतेसाठी एक पर्वणी असते मतदारसंघांमध्ये विविध सामाजिक विक्रम शालेय स्पर्धा पुस्तके वाटप अशा नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून हा वाढदिवस साजरा करण्यात येतो अशा धुरंदर नेतृत्वाविषयी मी आज माझे थोडे विचार मांडतात १९९९ आष्टी मतदार संघात आमदारकी पटकवल्यानंतर सलग पाच टर्म विधानसभेचे सदसत्व अबाधित ठेवणारे लोकनेते लोकनायक सुरेश आण्णा धस यांनी आपल्या कार्यकाळात अनेक मोठमोठ्या योजना नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्याचे काम केले आहे यामध्ये सर्वात मोठी महत्त्वकांक्षी योजना ही शिंपोरा ते कुंटेफळ ही जलवाहिनी



योजना आष्टी मतदार संघामध्ये एक मोठी हरितक्रांती घडवणारी ठरणार आहे या योजनेच्या माध्यमातून जवळपास ८० हजार हेक्टर जमीन ओलिताखाली येणार आहे अशा महत्त्वकांक्षी योजनेवर आष्टी पाटोदा व शिरूर या तिन्ही नगरपंचायत च्या माध्यमातून नगराऊथान योजनेअंतर्गत शहरांमध्ये मोठमोठे सिमेंट असते अंडरग्राउंड नाली बांधकाम प्रत्येक समाज बांधवांना समाज मंदिरे तसेच मुस्लिम कब्रस्तानला संरक्षण भिंतीचे कंपाउंड त्याचबरोबर राजकारणामध्ये विविध पदावर सर्वसामान्यातून वडार जातीच्या माळी समाजाच्या मुस्लिम समाजाच्या अगदी जैन समाजाच्या व मायक्रोच्या मायक्रो ओबीसीतील काही अगदी ऊस तोडणी कामगार असलेल्या आशाताई कराड यांना आष्टी पंचायत सभापती बसवण्याचे काम देखील या लोकनेतेने केले होते. कुठल्याही मतदार संघातील जनतेला दवाखान्याच्या माध्यमातून असेल अथवा कुठलेही अडचण असेल या अडचणीमध्ये मदतीचा हात देणार हा लोकनेता गतवर्षी २०२४ च्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये या सर्वसामान्यातून उदयाला आलेल्या नेतृत्वाला रोखण्यासाठी अनेक मोठ्या शक्तीने प्रयत्न केले मात्र या सर्वसामान्य जनतेने त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून जवळपास एक लाख ४० हजार एवढे मतदान देऊन व ७८ हजार च्या मताधिक्याने त्यांना विधानसभेत पाठवले अशा जनतेला लाभलेल्या परिसराबद्दल लिहावे तेवढे कमीच आहे आज बीड जिल्ह्याला नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राला हवा असा हा दमदार आमदार लोकनेता सुरेश अण्णा धस यांनी बीड जिल्ह्यातील मासाजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची अमानुषपणे व फार खून झाला या कुणाचा एवढ्या सीताफिने व चाणाक्ष पद्धतीने तपासाला गती देण्यासाठी व यातील गुन्हेगारांना फाशीपर्यंत शिक्षा मिळवण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्र मध्ये काढण्यात आलेल्या आक्रोश मोर्चामध्ये आपला सहभाग नोंदवून प्रत्येक आक्रोश मोर्चामध्ये सुरेश आण्णा धस यांनी असे प्रकरणी या गुन्हेगारांची बाहेर काढली की त्यांना राज्याचे गृहमंत्री तथा मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणीस यांना त्या आरोपीवर नको का अंतर्गत कारवाई करण्यास भाग पाडले अशा लोकनायक लोकनेता दमदार आमदार सुरेश आण्णा धस हे जरी आज मंत्रिमंडळात मंत्री नसले तरी ते आज संपूर्ण महाराष्ट्राच्या जनतेच्या मनातील एक नामदार असल्याची चित्र सध्या विविध प्रसार माध्यमातून आपण पाहत आहात या पुढच्या काळात येत्या पाच फेब्रुवारी रोजी राज्याचे मुख्यमंत्री तथा भारतीय जनता पार्टीचे बाहुबली देवेंद्र फडणीस यांच्या शुभहस्ते कुंटेफळ येथील या महत्वपूर्ण क कामाचे उद्घाटन होणार आहे.



**शरद रेडेकर**

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार, दि. १ फेब्रुवारी २०२५



## चोरीस गेलेले मोबाईल फोन पोलिसांनी मिळून दिले परत; बीड शहर डीबी पथकाची ४८ तासात कामगिरी

बीड । प्रतिनिधी

दोन दिवसांपूर्वी जिजामाता चौक येथे भाजीपाला विकणाऱ्या महिला उर्मिला गणेश काशीद राहणार जिजामाता चौक, बीड यांचा मोबाईल कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेला होता.

तसेच निलेश फुलचंद तिडके राहणार धानोरा रोड बीड. यांचा मोबाईल रिक्षात विसरून राहिला होता परंतु रिक्षावालाने तो लबाडीने चोरून ठेवला होता. या दोन्ही मोबाईलचा तपास बीड शहराच्या डीबी पथकाने वेगाने करून ४८ तासाच्या आत दोन्हीही मोबाईल परत मिळून दिले. दोन्ही मोबाईल महागडे होते आणि ते मोबाईल परत मिळाल्यानंतर यातील पीडित यांनी समाधान व्यक्त केले आहे. सदरील कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कांवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वंभर गोल्डे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबा राठोड, पोलिस अंमलदार बाळासाहेब शिरसाट, जयसिंग वायकर, मनोज परजणे, अश्फाक सय्यद यांनी केली आहे.

# जालन्याचा नियोजनबद्ध विकास अन् सामान्य माणसांच्या हितासाठी माझे काम -पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे

## ४११ कोटी १७ लाख रूपयांच्या प्रारूप आराखड्यास मंजूरी; जिल्हा नियोजन समितीची बैठक खेळीमेळीत

जालना । प्रतिनिधी

आगामी काळात जिल्हयाचा नियोजनबद्ध विकास आणि सामान्य माणसांच्या हितासाठी नियमाच्या चौकटीत राहून आपले काम असणार आहे. या भागात उद्योग, व्यवसाय वाढावा यासाठी आपण सर्व लोकप्रतिनिधींसह प्रयत्नशील असणार आहोत, असे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी केले. जिल्हा नियोजन समितीच्या त्यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या बैठकीत ४११ कोटी १७ लाख रूपयांच्या प्रारूप आराखड्यास मंजूरी देण्यात आली.



जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात आज पार पडलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीला आ. बबनराव लोणीकर, आ. अर्जुन खोतकर, आ. संतोष दानवे, आ. हिकमत उढाण, आ. राजेश राठोड, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बसंल, जिल्हा नियोजन अधिकारी सुनिल सुर्यवंशी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, सन २०२५-२६ साठी जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण अंतर्गत शासनाने ठरवून दिलेली वित्तीय मर्यादा रु.३३२ कोटी २० लाखाची असून, जिल्ह्यातील विविध विकासकामांसाठी रु.२६७ कोटी ८० लाख वाढीव निधीसह जिल्हास्तरीय समितीसमोर सादर करण्याकरीता एकूण रु.६०० कोटी रुपयांचा प्रारुप आराखड्यास मंजूरी देण्यात आली आहे. सन २०२४-२५ साठी जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी क्षेत्र बाह्य घटक कार्यक्रम) अंतर्गत एकूण रु.४६९ कोटी १३ लाख तरतूद अर्थसंकल्पित झाली असून, बीडीएसवर रु.२६० कोटी ३३ लाख तरतुद प्राप्त आहे. तसेच सन २०२४-२५ साठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसधारण, अनुसूचित जाती घटक कार्यक्रम व आदिवासी क्षेत्र बाह्य घटक कार्यक्रम) अंतर्गत रु.३४१ कोटी ४३ लाख रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता झालेल्या असून, प्राप्त निधी पैकी रु.१४४ कोटी ४८ लाखांचा निधी वितरीत झाला असुन, रु.१२२ कोटी ०७ लाख निधी यंत्रणांनी आहरीत केला आहे. सन २०२४-२५ मधील मंजूर निधीतून जनतेला अधिक चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी वीज, पाणी, आरोग्य, रस्ते वाहतूक, कृषि विषयक सेवा आदींबाबत योग्य नियोजन करून प्रस्ताव सादर करुन सदर निधी विकासकामांवर वेळेत खर्च करावा. प्रस्ताव तयार करतांना स्थानिक गरजा, कामांची निकड, प्राथमिकता व लोकप्रतिनिधींची मागणी विचारात घेवून विकासकामे करावी, असे निर्देशही पालकमंत्री मुंडे यांनी दिले. यावेळी अवैध वाळू उपसा, अतिक्रमण, घरकुलांना वाळुची उपलब्धता, पाटांची दुरुस्ती, जलजीवन मिशनची कामे यावर चर्चा झाली.

पान ६ वरून...

## खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाचे

शालेय समितीचे अध्यक्ष, माध्यमिक विद्यालयाच्या अर्थ समितीचे सदस्य तसेच अनेक सेवानिवृत्तशिक्षक,मुख्याध्यापक,संस्था सभासद या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वती, अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.नंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.त्यानंतर प्रथम संस्थेच्या वतीने मंचावरील सर्व मान्यवरांनी बाबुराव आडे व गंगासागर आडे यांचे स्वागत केले.नंतर शालेय सहका-यांच्या वतीने उपमुख्याध्यापक विवेक जोशी, पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे,पर्यवेक्षक प्रशांत पिंपळे,राजेंद्र कुलकर्णी,लक्ष्मण काटे,मोरेश्वर देशपांडे,वर्षा मुंडे, कुसुमावती बडेराव,सपना डुकरे,हनुमंत कसपटे यांनी स्वागत केले. नंतर सन्मानपत्राचे वाचन हनुमंत कसपटे,निवृत्त कर्मचारी धनाजी जाधव यांनी केले.आडे सरांच्या कार्यावर विशेषांक तयार करण्यात आला.यांचे विमोचन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले.यासाठी शिवशंकर भंडारे यांनी विशेष प्रयत्न केले.यानंतर काही सहकारी शिक्षकांनी मनोगत व्यक्त केले.यात सेवानिवृत्त मुख्याध्यापक विजेंद्र चौधरी,शैलेंद्र कंगळे,बबन गायकवाड,अनिता येलमटे,सतीश वांगे,शिवशंकर भंडारे, सरांचा मुलगा सचिन आडे होते. सत्कारमूर्ती आडे सर यांनी मनोगत व्यक्त केले ते म्हणाले की,मी अंत्यत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतले. मोठया बधुंनी मला शिक्षणासाठी प्रेरणा दिली.मला शालेय जीवनात चांगले शिक्षक मिळाल्यामुळे मी आज चांगले कार्य करू शकलो. माझ्या वैयक्तिक आणि कौटुंबिक आजच्या सुस्थितीसाठी संस्थेचे फार मोठे योगदान आहे ते योगदान मी कधीही विसरू शकणार नाही.संस्थेने व पदाधिकार्यांनी मला अनेक कठीण प्रसंगात सुध्दा खुप सांभाळून घेतले त्याबद्दल मी त्यांचे ऋण व्यक्त करतो. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी संस्थेचे मुख्य प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे म्हणाले की,आडे सरांनी त्यांच्या सेवाकालावधीत खुप चांगले काम केले.एक उत्तम प्रशासक व शिक्षक होते.आडे सरांनी माणस जोडण्याचे कार्य केले.याप्रसंगी संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंत वैद्यम्हणाले की,आडे सरांनी आपल्या संपूर्ण कार्यकालामध्ये शिक्षक आणि प्रशासक म्हणून अतिशय उत्तम कार्य केले.विद्यार्थ्यांचे प्रेम आडे सरांनी कमविलेले या ठिकाणी दिसते.सरांनी निवृत्तीनंतर संस्थेच्या कार्यासाठी योगदान द्यावे. त्यांच्या पुढील निरोगी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोप करताना डॉ. सुरेंद्र आलूरकर म्हणाले की,आडे सरांचे वौशिष्ट म्हणजे त्यांनी लहाणपणापासूनच संघर्ष केला. त्यामुळे आज त्यांचे जीवन आज यशस्वी आहे.आपल्या संस्थेतील वातावरण कौटुंबिक पध्दतीचे आहे. आडे सरांनी त्यांच्या कार्यकालात केलेल्या कामाची पोहोच पावती म्हणजे आजची सर्व संस्कार केंद्रामधून आलेले सहकारी होय. केंद्रीय कार्यकारिणी सदस्य म्हणून सरांचे कार्य अतिशय मोलाचे आहे.चांगल्या आरोग्यासाठी व दिर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन राजेंद्रशेप, प्रास्ताविक पर्यवेक्षक सुर्यकांतउजगरे, स्वागत व परिचय श्रीकांत काळे, सन्मानपत्राचे वाचन हनुमंत कसपटे, वैयक्तिक पद्य दुर्गा सांगवीकर,आभार प्रदर्शन श्रीकांत देशपांडे,कल्याण मंत्र किशोरी कुलकर्णी यांनी सादर केले.या कार्यक्रमासाठी उपमुख्याध्यापक विवेक जोशी,पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे,पर्यवेक्षक प्रशांत पिंपळे, अभ्यासपुरक मंडळ प्रमुख श्रीकांत देशपांडे,विश्वास पत्की व सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

-----------

## शिक्षकनेते दिलीप जायभाये यांचा शाही सेवापूर्ती समारंभ संपन्न

मानूर । प्रतिनिधी

लोकनेते गोपीनाथ मुंडे शिक्षक सहकारी पतसंस्थेचे चेअरमन तथा शिक्षकनेते दिलीप अण्णा जायभाये यांचा शाही सेवापुर्ती समारंभ सिद्धेश्वर संस्थानच्या मंगल कार्यालयात संपन्न झाला.या वेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन सिद्धेश्वर संस्थानचे महंत स्वामी विवेकानंद शास्त्री हे तर प्रमुख पाहुणे म्हणून उद्धव दरेकर,युवा नेते जयदत्त धस,राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख,ज्येष्ठ नेते दशरथ वनवे,उपनगराध्यक्ष प्रकाश देसारडा,माजी सभापती बाबुराव केदार,सुधाकर मिसाळ,भाजपा तालुकाध्यक्ष सुरेश



उगलमुगले,शिक्षणाधिकारी नागनाथ शिंदे,गटविकास अधिकारी संजय केंद्रे,महादेव जायभाये गटशिक्षणाधिकारी जमीर शेख यांची उपस्थिती होती.या वेळी दिलीप अण्णा जायभाये यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या कार्याचा आढावा मान्यवरांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केला.सेवेची ३६ वर्ष अविरतपणे त्यांनी ज्ञानदानाचे कार्य करत असतानाच पाटोदा आणि शिरूर तालुक्याच्या संयुक्त शिक्षक पतसंस्थेत संचालक म्हणून काम पाहिले.त्यानंतर शिरूर तालुक्याचे विभाजन झाल्यानंतर लोकनेते गोपीनाथ मुंडे शिक्षक सहकारी पतसंस्थेची स्थापना करण्यात आली.या पतसंस्थेत स्थापनेपासून ते सेवानिवृत्त होईपर्यंत त्यांनी आपल्या पदाचा वापर शिक्षकांच्या समस्या सोडविण्यासाठी केला.त्याचा परिपाक म्हणून शुक्रवारी त्यांच्या सेवापूर्ती समारंभासाठी विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.या वेळी कार्यक्रमाला अमोल गाडेकर,प्रकाश बडे,सोपान मोरे,बाळासाहेब गायकवाड,गटनेते गणेश भांडेकर, गणेश तळेकर,नगरसेवक सावता कातखडे,डॉ.भगवान सानप,अरुण भालेराव,सुदाम काकडे,सुभाष क्षीरसागर,संतोष गोल्हार, बबनराव जायभाये,अशोक बांगर,संजय बारगजे,डॉ.उदय बारगजे यांच्यासह तालुक्यातील शिक्षक,शिक्षिका यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मधुकर सानप यांनी तर सूत्रसंचालन कैलास तुपे,संभाजी सोनवणे यांनी केले.



### उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कारप्राप्त डॉक्टर आबासाहेब हंगे यांचा नागेश्वर न्यूज पेपर एजन्सीच्या वतीने सत्कार

**चुंबळी फाटा दी वसंत दादा पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हंगे सर यांना महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र करियर कट्टा उपक्रमातील बीड जिल्हा पातळीवरील उत्कृष्ट प्राचार्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याबद्दल त्यांचा नागेश्वर न्यूज पेपर एजन्सी चुंबळी फाटा च्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी अशोक पवळ (पत्रकार) व सूर्यकांत पवळ .**

## सिद्धेश्वर पिंपळगाव येथे अंखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन; तुकबाबा यांच्या ३३ व्या पुण्यतिथि निमित्ताने आयोजन

**अंबड । प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील ताडहादगाव येथील सद्गुरू रामानंद सरस्वती (तुकबाबा )यांच्या ३३ व्या पुण्यतिथि निमित्ताने श्रीक्षेत्र सिद्धेश्वर पिंपळगाव तालुका घनसावंगी येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या वर्षीच्या सप्ताहाची सुरुवात दिनाक ७ फेब्रुवारी शुक्रवार रोजी होणार असून दिनाक १४ फेब्रुवारी शुक्रवार रोजी या सप्ताहाची सांगता होणार आहे तर या सप्ताहामध्ये भागवताचार्य श्री.ह.भ.प. भाऊसाहेब महाराज जोशी यांच्या सुमधुर वाणीतून आपणास श्रीमद भागवत कथेचे श्रवण करण्यास मिळणार आहे.त्याच बरोबर यावर्षीच्या सप्ताहाच्या पहिल्या दिवशी म्हणजे दिनाक ७ फेब्रुवारी शुक्रवार रोजी भागवताचार्य श्री.ह.भ.प.भाऊसाहेब महाराज जोशी यांचे रात्री ९ ते ११ वाजेच्या दरम्यान हरिकीर्तन होणार आहे तर दुसर्या दिवशी दिनाक ८ फेब्रुवारी शनिवार रोजी आचार्य भगवंत महाराज पुरी पंचमुखेश्वर संस्थान भाटेपुरी तळा गेवराई यांचे हरिकीर्तन आहे तसेच दिनाक ९ फेब्रुवारी रविवार रोजी योगीराम महाराज वायसळ (शास्त्री) रामकृष्ण भक्तीधाम लखमापुरी,छत्रपती संभाजीनगर यांचे कीर्तन आहे. तर १० फेब्रुवारी सोमवार रोजी श्री १००८ स्वामी शिवेंद्रजी चैतन्य महाराज,यशवडी देवस्थान यांचे कीर्तन असून दिनाक ११ फेब्रुवारी वार मंगळवार रोजी विद्याविनोद वैभव पांडुरंग महाराज उगले परभणी यांचे हरी किर्तन होणार असून दिनांक १२ फेब्रुवारी बुधवार रोजी आचार्य पांडुरंग शास्त्री चितोळे आळंदी देवाची यांचे हरी किर्तन होणार आहे दिनांक १३ फेब्रुवारी वार गुरुवार रोजी १००८ महंत स्वामी अमोलांनद गिरी सच्चिदानंद आश्रम सावत्रा मेहकर यांचे हरी किर्तन होईल तर शेवटचे काल्याचे कीर्तन दिनाक १४ फेब्रुवारी शुक्रवार रोजी रोजी सकाळी ९ ते ११ यावेळेत ह भ प बळीराम महाराज कुटे यांचे होणार असून त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.



# शिवसंग्राम जिल्हा कार्यकारिणी बरखास्त

बीड । प्रतिनिधी

शिवसंग्राम संघटनेची बीड जिल्हा कार्यकारीणी बैठक शिवसंग्राम भवन बीड येथे शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या अध्यक्षतेखाली व प्रदेश उपाध्यक्ष श्री. प्रभाकर अप्पा कोलांगडे यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवार, दि. ३० जानेवारी रोजी संपन्न झाली.येत्या काळात येऊन ठेपलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था व बीड नगर पालिका निवडणूक अनुषंगाने तसेच पक्षबांधणी विस्तार अनुषंगाने जिह्वा कार्यकारिणी बरखास्त करून काल शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ.ज्योतीताई मेटे यांनी नूतन जिल्हाध्यक्षपदी प्रा.सुभाष जाधव सर, जिल्हा



### शिवसंग्रामच्या नूतन जिल्हाध्यक्षपदी प्रा.सुभाष जाधव सर यांची निवड जाहीर

**अनिल घुमरे जिल्हा सरचिटणीस, पंडित माने बीड तालुकाध्यक्ष, सुहास पाटील बीड शहराध्यक्ष व दिनकर शेळके बीड तालुका उपाध्यक्ष यांच्या निवडीही जाहीर**

सरचिटणीस अनिल घुमरे, बीड तालुकाध्यक्ष पंडित माने, बीड तालुका उपाध्यक्षपदी दिनकर शेळके व बीड शहराध्यक्षपदी सुहास पाटील यांच्या निवडी जाहीर केल्या.उर्वरित निवडी यथावकाश जाहीर करण्यात येतील असे यावेळी सांगण्यात आले.

याप्रसंगी जिल्ह्यातील उपस्थित पदाधिकारी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना डॉ. ज्योतीताई मेटे यांनी सांगितले की,आगामी काळात झोकून काम करण्याची तयारी नवनिर्वाचित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी ठेवा .प्रत्येकाने जबाबदारी ओळखून जबाबदारीने काम करावे.नवनियुक्त पदाधिकाऱ्यांकडून १००% कामाची अपेक्षा आहे.नगरपालिका पंचायत समिती जिल्हा परिषद निवडणुका समोर ठेवून या निवडी करण्यात आलेले आहेत. शिवसंग्राम अंतर्गत आगामी काळात नवीन आघाडी तयार केल्या जातील. ग्रामीण व शहरी भागात जास्तीत जास्त कार्य करावे. येत्या काळात जास्तीत जास्त पदाधिकारी कार्यकर्त्यांचे जाळे बीड जिल्ह्यात करावयाचे आहे. पक्षाची शिस्त पाळा.पक्षामध्ये एक कुटुंब म्हणून वागा. तरुणांनी बदल करायची हिंमत दाखवली पाहिजे सकारात्मकता, आक्रमकपणा कार्यकर्त्याने अंगी बनवावा. सदैव हिरोच्या भूमिकेत रहा,आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती संपूर्ण जागा स्वहिमतीवर लढायच्या आहेत मराठा आरक्षण, अरबी समुद्रातील छत्रपती शिवरायांचे स्मारक,शेतकऱ्यांना निवृत्ती वेतन देण्याकरिता यापुढील वाटचाल करायचे आहे. सोशल मीडियावर सतर्क रहा,शिवसंग्रामचा झेंडा डौलाने फडकवत दिलेल्या जबाबदारीला जागा, संघटनेला व स्वतःला मोठे करा अशा स्पष्ट शब्दांत उपस्थित कार्यकर्त्यांना शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ.ज्योतीताई मेटे यांनी मार्गदर्शन केले.

## श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे सांस्कृतिक स्नेहसंमेलन कार्यक्रमामध्ये चिमुकल्याने जिंकली प्रेक्षकांची मने

**बीड । प्रतिनिधी**

श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे दिनांक ३१ जानेवारी २०२५ वार शुक्रवार या दिवशी स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन आणि प्रतिमापूजनाने मान्यवरांच्या हस्ते झाली या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून श्रीमती श्रेया कदम मॅडम तसेच शाळेचे अध्यक्ष श्री पारगावकर सर ,श्रीमती स्नेहा पारगावकर ,मॅडम ,सचिव शेख पाशा सर ,उपमुख्याध्यापिका श्रीमती अनिता सूर्यवंशी मॅडम, लोळगे चंपावती महोत्सवाचे अध्यक्ष प्रतीक कांबळे सर, मोठ्या संख्येने पालक वर्ग विद्यार्थी आणि त्यांचे नातेवाईक



इत्यादी उपस्थित होते सुरुवातीला गणेश वंदनाचे विद्यार्थ्यांनी साजरीकरण केले.

या कार्यक्रमांमध्ये पूर्व प्राथमिक गटातील विद्यार्थ्यांनी स्वागत गीत तसेच आज हे संडे आणि आई-वडिलावर आधारित गीतावर बहारदार नृत्य सादर केले. या गीतामध्ये प्रत्यक्ष आई-वडिलांनीही स्वतःचा सहभाग नोंदवला आणि उत्कृष्ट नृत्य सादर केले. प्राथमिक गटातील विद्यार्थ्यांनी भाऊ-बहीण, आजी आजोबा ,मैत्री यावर आधारित उत्कृष्ट नृत्य सादर केले. तसेच सहावी ते नववी गटातील विद्यार्थ्यांनी स्त्री भृण हत्या, अंधश्रद्धा निर्मूलन, तानाजी ,गरबा ,वंदे मातरम, जुने पुराने हिंदी गाणे, शिक्षणाचे महत्व ,इत्यादी गाण्यावर बहारदार नृत्य सादर केले. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे या कार्यक्रमासाठी मुंबई बोरिवली येथील श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथील प्राचार्या ,शिक्षणतज्ञ श्रीमती श्रेया कदम मॅडम खूप व्यस्त असतानाही आवर्जून या कार्यक्रमासाठी हजर राहिल्या आणि सर्व शिक्षकांना आणि पालकांना त्यांनी खूप चांगल्या पद्धतीने मार्गदर्शन केले. त्यांचा परिचय शिक्षिका श्रीमती पूजा मॅडम यांनी दिला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अपूर्वा कुलकर्णी मॅडम आणि स्वाती पाटील मॅडम या दोघींनी केले. तसेच डान्स कोरिओग्राफर किरण सर आणि नेहा मॅडम या दोघांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम या गीताने झाली हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक वृंद, सहकारी यांचे सहकार्य मिळाले.

## शिरुर वरून कुंभमेळ्यासाठी ५० भाविकांचे प्रस्थान पाटोदा आगाराकडुन अल्पदरात भाविकांची व्यवस्था

**मानूर । प्रतिनिधी**

**एस टी मंहामंडळाच्या पाटोदा आगाच्या वतीने शिरूर येथून कुंभमेळयासाठी अल्पदरात व्यवस्था करण्यात आली असून शिरूर येथून ५० भाविकांचे प्रस्थान सिदधेश्वर संस्थानचे महंत विवेकानंद स्वॉमी महाराज यांच्या हस्ते व सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांच्या उपस्थितीमधे चालक व वाहक यांचा सत्कार करून प्रस्थान झाले.**

राज्य परिवहन मंडळ पाटोदा आगार यांनी शिरूर तालुक्यातील भाविकांसाठी परळी-औंढा नागनाथ-माहुर-प्रयागराज (कुंभमेळा) व पुढे वाराणसी आयोध्या-उज्जैन-



ओंकारेश्वर-भद्रामारोती-घृणेश्वर जोतीर्लींग-शिरूर कासार असा जवळपास दहा दिवसाचा प्रवास करून सर्व भाविक परत येतील यासर्व नियोजनासाठी चालक -अमोल जाधव,मारोती मिसाळ व वाहक -नवनाथ पानखडे,राम कुलकर्णी.हे सेवादेत आहेत तसेच त्यांनारामेश्वर क्षीरसागराळे, अशोक कातखडे हे विशेष सहकार्य करत आहेत.प्रस्थानावेळी सिदधेश्वर संस्थानचे महंत विवेकानंद स्वॉमी महाराज यांच्या हस्ते चालक व वाहक यांचा सत्कार करून सुखकर प्रवासाठी शुभेच्छा दिल्या तर सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांनी पाटोदा आगार प्रमुख यांनी भाविकांना अल्पदरात स्वतंत्र बस उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानुन सर्व भाविकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी जेष्ट पत्रकार गोकुळ पवार, डॉ.शेषेराव बडे, नगरसेवक सावता कातखडे, ग्रामसेवक संघटनेचे दिलीप मिसाळ, बाळासाहेब गायकवाड,भारत बनकर, बबन कातखडे, किरण चौधरी आदींसह भाविक यांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

# सोयाबीन खरेदीला ६ फेब्रुवारीपर्यंत मुदत; केंद्र सरकारने प्रस्तावाला दिली मान्यता

मुंबई : राज्यात सोयाबीन खरेदीला ६ फेब्रुवारीपर्यंत मुदत वाढ देण्याच्या निर्णयाला केंद्रीय कृषिमंत्र्यांनी मान्यता दिली आहे, अशी माहिती राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिली. शेतकऱ्यांनी २९ फेब्रुवारीपर्यंत खरेदीला मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. मात्र केंद्र सरकारने केवळ ६ दिवसांची मुदतवाढ दिली आहे. परंतु नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळेल, असे चित्र आहे.

मंत्री रावल यांनी खरेदीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात मदत होणार असल्याचे सांगितले. रावल म्हणाले, राज्यात ३१ जानेवारीपर्यंत देण्यात आलेली सोयाबीन खरेदीची मुदत ३१ जानेवारी रोजी संपली आहे. परंतु सोयाबीन खरेदीची मुदत वाढवा, अशी राज्यातील शेतकऱ्यांची मागणी होती. त्यामुळे मुदतवाढीसाठी पाठपुरावा सुरू होता. केंद्र सरकारने ६ फेब्रुवारीपर्यंत सोयाबीन खरेदीला मुदत वाढ दिली आहे. अशी माहिती रावल यांनी दिली. रावल म्हणाले, खरेदी केंद्रावर ३० जानेवारीपर्यंत



४ लाख ३७ हजार ४९५ शेतकऱ्यांकडून ९ लाख ४२ हजार ३९७ मेट्रिक टनापेक्षा अधिक सोयाबीनची खरेदी झाली आहे. ६ फेब्रुवारीपर्यंत या आकड्यात मोठी वाढ होऊन समाधानकारक खरेदी होणार आहे. अनेक जिल्ह्यांनी आपले उद्दिष्ट पूर्ण केले आहे तर काही जिल्ह्यांना उद्दिष्ट वाढवून दिले आहे. सोयाबीन खरेदीच्या खंडीभर अडचणीमुळे शेतकरी हैराण झाले आहेत. सोयाबीनचे दर हमीभावाच्या खाली असल्याने केंद्र सरकारने सोयाबीन खरेदीचा निर्णय घेतला. महाराष्ट्रातून १४ लाख १३ हजार २६९ टन सोयाबीन खरेदीचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं. परंतु उशिराने खरेदी केंद्र चालू करण्यात आली. त्यात बारादाना तुटवडा, ओलाव्याचे निकष यामुळे शेतकऱ्यांची कोंडी झाली. दरम्यान, केंद्र सरकार १२ जानेवारीच्या अंतिम मुदतीला ३१ जानेवारीपर्यंत मुदत वाढ दिली. मात्र बारदाना टंचाईमुळे आणि गोदामातील जागेअभावी खरेदी रखडून पडली. तर काही खरेदी केंद्र मुदतीपूर्वीच बंद करण्यात आले. त्यामुळे शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेत आंदोलन केली. त्यानंतर राज्य सरकारने केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंग चौहान यांना मुदत वाढीचा प्रस्ताव पाठवला होता. या प्रस्तावाला अखेर मंजूरी देण्यात आली आहे.

## डाळिंब बागेत फळधारणा अवस्थेत ‘असे’ करा रसशोषक किडींचे नियंत्रण



सध्या डाळिंब बागेत मृगबहार अवस्थेतील फुलधारणा आणि फळधारणा वेळी पिकावर फुलकिडी, मावा, पांढरी माशी यासारख्या रसशोषक किडींचा प्रादुर्भाव आढळून येतो. या रसशोषक किडींचे नियंत्रण उपाय जाणून घेऊ या.

डाळिंब बागेत रसशोषक किडींचे एकात्मिक नियंत्रण :

बागेत स्वच्छता राखावी, तणांचे वेळीच नियंत्रण करावे. झाडाच्या शेंड्याच्या १५ सेंटिमीटर खाली नागमोडी पद्धतीने पिवळे/निळे चिकट सापळे २५-३० सापळे प्रति एकर याप्रमाणात लावावेत. रसशोषक किडींच्या नियंत्रणासाठी पहिली फवारणी स्पिनेटोरम १२% एससी १.० मिली/लिटर किंवा स्पिनोसॅड ४५% एससी ०.५ मिली/लिटर पाणी + ०.२५ मिली/लिटर स्प्रेडर स्टिकर याप्रमाणात फवारणी करावी.

रसशोषक किडींसाठी दुसरी फवारणी पहिल्या फवारणीनंतर ७-१० दिवसांनी, स्पिनोसॅड ४५% एससी ०.५ मिली/लिटरची दुसरी फवारणी किंवा निंबोळी तेल १% (१०००० पीपीएम) ३.० मिली/लिटर किंवा पोंगामिया तेल (करंज तेल) ३ मिली/लिटर किंवा नीमतेल + पोंगामिया तेल प्रत्येकी ३ मिली/लिटर + ०.३ मिली/लिटर स्प्रेडर स्टिकरच्या मिसळून फवारणी करावी.

तिसरी फवारणी स्पिनेटोरम १२% एससी १.० मिली/लिटर किंवा स्पिनोसॅड ४५% एससी ०.५ मिली/लिटर + ०.२५ मिली /लिटर स्प्रेडर स्टिकर मिसळून फवारणी करावी. सायंकाळच्या वेळी बागेत धूर करावा. रसशोषक किडीवर उपजीविका करणाऱ्या परोपजीवी किडींचे (क्रायसोपर्ला, ढालकीडा, क्रिप्टोलेमस, सिरफिड माशी इ.) संवर्धन करावे.

## द्राक्ष बागेतील ‘पिंक बेरी’ टाळण्यासाठी उपाय

बागेतील किमान तापमान १० अंश सेल्सिअस पेक्षा कमी झाल्यास वेलीच्या शरीरशास्त्रीय हालचालीचे संतुलन बिघडते आणि मण्यातील हिरवे रंग गुलाबी रंगात बदलू शकते. यालाच गुलाबी मणी किंवा पिंक बेरी असेही म्हणतात. अशी प्रकारची द्राक्षे निर्यात करता येत नाही. या विकृतीसाठी कोणतेही रासायनिक उपाय अद्याप उपलब्ध नसल्याने यासाठी प्रतिबंधात्मक उपाय करणे गरजेचे असते.



प्रतिबंधक उपाय : मण्याचे पाणी उतरण्याच्या अवस्थे आधी द्राक्षाचे घड पेपरने झाकल्यास कमाल आणि किमान तापमानातील तफावत कमी राहण्यास मदत होते त्यामुळे गुलाबी मणी ही विकृती टाळता येते. मात्र घड पेपरने झाकण्यापूर्वी बागेत मिली बग किडी आणि भुरी रोग नियंत्रित असल्याची खात्री करावी. कारण एकदा पेपर झाकल्यानंतर फळ काढणीच्या ५ ते ६ दिवस आधीच काढला जातो, तोपर्यंत तो तसाच झाकून ठेवलेला असतो. त्यामुळे किडी आणि रोगाचे नियंत्रण झाले नाही तर द्राक्ष फळे या प्रादुर्भावामुळे खाण्यायोग्य राहणार नाहीत. द्राक्ष घडावर जैविक कीड नियंत्रकाची फवारणी करून घड झाकावे. पिंक बेरी टाळण्यासाठी बागेस रात्रीच्या वेळेस पाणी द्यावे. बोदावर आच्छादन केल्यास मुळाच्या कक्षेतील तापमान वाढण्यास मदत होते. किमान तापमानात फारच कमी झाल्यास बागेत ठिकठिकाणी शेकोटी पेटवून धूर करावा, त्यामुळे तापमान नियंत्रित राहण्यास मदत होते. शक्य असल्यास बागेभोवती पडदे लावावेत.

## वाढत्या उन्हात संकरित गायींची घ्या काळजी

देशी गाई वाढते तापमान सहन करु शकतात. पण संकरित गायींना वाढत्या तापमानाचा ताण सहन होत नाही. त्यामुळे संकरित गायींच्या आरोग्यावर परिणाम होऊन त्यांच दूध उत्पादन कमी होते. त्यामुळे उन्हाळ्यात संकरित गायींची विशेष काळजी घ्यावी लागते.

वातावरणातील तापमान वाढल्याने संकरित गाई त्यांच्या शरीराचे तापमान वाढू नये आणि ते सर्वसाधारण राहावे यासाठी प्रयत्न करते. पहिल्यांदा शरीरात तयार होणारी ऊर्जा शरीराबाहेर ढकलते आणि दुसरे म्हणजे शरीरात कमीत कमी ऊर्जा तयार होण्यासाठी दैनिक व्यवस्थापनात बदल करते. सर्वसाधारणपणे संकरित गाईसाठी ३३ अंश सेल्सिअस तापमान भारतीय गोवंश आणि म्हशीसाठी ३६ अंश सेल्सिअसपर्यंत तापमान योग्य समजले जाते. तापमान ज्या वेळेस जास्त होते, त्या वेळेस जनावरे आपल्या शरीराचे तापमान घर्मग्रंथी किंवा धापण्याच्या प्राक्रियेमार्फत नियंत्रित करण्याचा प्रयत्न करतात. ज्या वेळी वातावरणातील तापमान या कक्षेबाहेर जाते म्हणजे कमी किंवा जास्त होते अशा वेळी जनावराला शरीरावर होणाऱ्या विपरीत परिणामांचा ताण सहन करावा लागतो.

वाढत्या तापमानाचा संकरित जनावराच्या शरिरावर होणार परिणाम :१) शरीरात तयार होणारी ऊर्जा जनावर बाहेर टाकत असते परंतु अशा वेळेस बाहेरील तापमान वाढल्याने ऊर्जा बाहेर टाकण कठीण होते. त्यातच बाहेरील ऊर्जेचा अधिक भार वाढल्याने जनावराच्या ऊर्जा निस्सारण यंत्रणेवर परिणाम होतो. २) संकरित जनावराच्या हार्मोन्स निर्मितीत बदल होतो, त्यामुळे दूध उत्पादन,आरोग्य, आहार आणि प्रजननावर विपरीत परिणाम होतो. ३) शरीरातील अन्नघटक हे तापमान नियंत्रणासाठी वापरल्याने जनावर अस्वस्थ होते. आहार कमी होऊन तहान, भूक मंद होते. जनावर तापमान नियंत्रण करण्यासाठी स्वतःची यंत्रणा वापरण्यास सुरवात करते. यामध्ये श्वासोच्छ्वासाचा दर वाढून धाप लागल्यासारखे करते. तोंडाने श्वासोच्छ्वास करते. श्वासोच्छ्वास उथळ, जास्त वेगाने होतो. नाडीचा वेग वाढतो. ४) जनावर स्वत: तपमान नियंत्रण करण्यापलीकडे जाते. शरीराचे तापमान १०४ ते १०६ अंश फॅरानहाइट वाढून कातडी कोरडी पडते. डोळे लालसर होतात, डोळ्यांतून पाणी गळते. पित्ताचा त्रास होऊन अतिसार होण्याची शक्यता असते. लघवीचे प्रमाण कमी होते. जनावरे बसतात. गाभण गायी गाभडण्याचे प्रमाण वाढते. ५) ज्या वेळेस तापमान ३५ अंश सेल्सअसपेक्षा जास्त होते, त्यावेळेस दूध उत्पादनात ३० टक्क्यांपर्यंत घट येऊ शकते आणि जेव्हा हेच तपमान ४० अंश सेल्सअसपेक्षा जास्त जाते त्या वेळेस दूध उत्पादनामध्ये ५० टक्क्यांपर्यंत घट होऊ शकते. योग्य काळजी न घेतल्यास ही घट वाढत जाते. ६) उष्णतेच्या परिणाम वासरे, कालवडींच्या वाढीवर अधिक प्रमाणात होत असतो. दुधातील स्निग्धांश व प्रथिनाचे प्रमाण कमी होते. आहार कमी होतो. ७) प्रजनन यंत्रणेवर परिणाम होते. उष्णतेचा ताण असणारी गाय माजावर येत नाही. गाभण राहण्यास अडचणीचे ठरते. गाभण गाईंना उष्णतेचा ताण बसल्यास गर्भपात होऊ शकतो किंवा अकाली प्रसूती होऊ शकते. खुरांचे आजार तसेच लंगडेपणा वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे जास्त तापमानात संकरित गायींची अधिक काळजी घ्यावी लागते.



## दिन विशेष

### जागतिक दिवस
### भारतीय तटरक्षक दल दिवस

### महत्वाच्या घटना

१६२६ : आजच्या दिवशी पहिला चार्ल्स इंग्लंड चा राजा बनला.
१८४८ : कॅलिफोर्निया गोल्ड रश सोने मिळवण्याच्या उद्देशाने चिनी स्थलांतरितांचा पहिला जथा कॅलिफोर्नियात दाखल झाला.
१८६३ : आजच्या दिवशी शंभू नाथ पंडित हे कोलकत्ता उच्च न्यायालयाचे पहिले न्यायाधीश बनले.
१९०१ : आजच्या दिवशी राणी विक्टोरिया चा अंतिम संस्कार करण्यात आला.
१९३३ : ॲडॉल्फ हिटलरने जर्मनीची संसद बरखास्त केली.
१९४३ : दुसरे महायुद्ध स्टॅलिनग्राडच्या लढाईनंतर जर्मनीचे सैन्य सोवियेत संघाला शरण, जर्मन सैन्याच्या माघारीची सुरूवात
१९५२ : आजच्या दिवशी भारताला पहिल्या कसोटी सामन्यात विजय मिळाला.
१९५७ : गोवा मुक्तीसंग्राम – नानासाहेब गोरे, मधू लिमये, जगन्नाथराव जोशी यांची गोव्यातील तुरूंगातुन मुक्तता.
१९६२ : ४०० वर्षांनंतर नेपच्यून व प्लूटो यांची युति
१९७१ : इदी अमीन हे युगांडाचे सर्वेसर्वा बनले.
१९७१ : इराणमधील रामसर येथे पाणथळ भूमीचे महत्त्व या विषयावर एक परिषद आयोजित करण्यात आली होती. मानवी जीवनातील पाणथळ भूमीचे महत्त्व समजावे म्हणून दरवर्षी २ फेब्रुवारी हा दिवस जगभर ’जागतिक पाणथळ भूमी दिन’ म्हणून साजरा केला जावा असा त्या परिषदेत निर्णय घेण्यात आला.
२००६ : महात्मा गांधी नरेगा कायदा आजच्या दिवसापासून २०० जिल्ह्यांमध्ये लागू केल्या गेले.
२०१३ : अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी अमेरिकेत राहत असेलेल्या एका विदेशी शास्त्रज्ञाला पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५६ : स्वामी श्रद्धानंद – स्वामी दयानंदांचे शिष्य, गुरुकुल विश्वविद्यालयाचे संस्थापक, शिक्षणमहर्षी आणि आर्य समाजाचे प्रसारक (मृत्यू: २३ डिसेंबर १९२६)
१८८४ : डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर – ज्ञानकोशकार. ’महाराष्ट्रीय ज्ञानकोश’ हे त्यांचे सर्वात महत्त्वाचे कार्य होय. (मृत्यू: १० एप्रिल १९३७ पुणे)
१८८७ : प्रसिद्ध राजनीतितज्ज्ञ तसेच समाजसेविका अम्रित कौर यांचा जन्म.
१९०५ : ॲन रँड – जन्माने रशियन असलेल्या अमेरिकन लेखिका व तत्त्ववेत्त्या (मृत्यू: ६ मार्च १९८२)
१९१५ : प्रसिद्ध भारतीय लेखक खुशवंत सिंह यांचा जन्म.
१९१६ : त्रिपुरा चे माजी मुख्यमंत्री दसरथ देब यांचा जन्म.
१९२३ : ललित नारायण मिश्रा – केंद्रीय रेल्वे मंत्री, गृह राज्यमंत्री, अर्थ राज्यमंत्री, पहिल्या, दुसर्या व पाचव्या लोकसभेचे सदस्य, राज्यसभा खासदार (मृत्यू: ३ जानेवारी १९७५ समस्तीपूर, बिहार)
१९७० : संसद च्या सदस्य प्रज्ञा सिंग ठाकूर यांचा जन्म.
१९७९ : शमिता शेट्टी – अभिनेत्री
१९८९ : भारतीय अभिनेत्री संदीप धार यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०७ : दिमित्री मेंदेलिएव्ह – रशियन रसायनशास्त्रज (जन्म: ८ फेब्रुवारी १८३४)
१९१७ : महर्षी अण्णासाहेब पटवर्धन – लोकमान्य टिळकांचे स्नेही आणि विख्यात वैद्य यांनी देहत्याग केला. (जन्म: ४ मे १८४७)
१९३० : वासुदेव गोविंद आपटे – लेखक, भाषांतरकार, पत्रकार, संपादक, अनुवादक, निबंधकार व शकार. त्यांनी लहान मुलांसाठी ’आनंद’ हे मासिक सुरू केले होते. (जन्म: १२ एप्रिल १८७१)
१९४१ : हिंदी भाषेतील प्रसिद्ध साहित्यकार तसेच निबंधकार आचार्य रामचंद्र शुक्ला यांचे निधन.
१९६० : हिंदी भाषेतील प्रसिद्ध लेखक आचार्य चतुरसेन शास्त्री यांचे निधन.
१९७० : बर्ट्रांड रसेल – ब्रिटिश गणितज्ञ, तत्त्वज्ञ आणि इतिहासकार (१८ मे १८७२)
१९८२ : राजस्थान चे माजी मुख्यमंत्री मोहन लाल सुखाडीया यांचे निधन.
१९८७ : ॲलिएस्टर मॅकलिन – स्कॉटिश साहसकथा लेखक (जन्म: २१ एप्रिल १९२२)
२००७ : विजय अरोरा – हिन्दी चित्रपट आणि टीव्ही अभिनेता (जन्म: २७ डिसेंबर १९४४.

## फळे, भाजीपाल्यासाठी सौर वाळवण यंत्र



आपल्या देशात ८ ते ९ महिने चांगला सूर्यप्रकाश उपलब्ध असतो. या उपलब्ध सूर्यप्रकाशाचा उपयोग विविध फळे व पालेभाज्या वाळविण्यासाठी करता येतो. फळे आणि पालेभाज्यांना वर्षभर चांगली मागणी असते. फळे आणि पालेभाज्या नाशिवंत असल्याने काढणीनंतर ते खराब होण्याची प्रक्रिया सुरू होते. सोलर टनेल ड्रायरच्या मदतीने हा शेतमाल वाळवून साठविल्यास तो दीर्घकाळ टिकवणे शक्य होते. नाशवंत शेतीमाल दीर्घकाळ टिकविण्यासाठी निर्जलीकरण करणारे यंत्र आहे. त्या माध्यमातून शेतीमालाचे योग्य पद्धतीने मूल्यवर्धन करण्यास मदत होते. सोलर ड्रायरचे अनेक प्रकार बाजारात उपलब्ध आहेत. पदार्थातील पाणी काढून घेणे हे त्यांचे मूलभूत तत्त्व आहे.

फळे व भाजीपाला वाळविण्याचा मुख्य उद्देश

सौर वाळवणी यंत्राच्या साहाय्याने फळे व भाजीपाल्यामधील ओलाव्याचे प्रमाण कमी करणे. नाशिवंत शेतीमालाची टिकवण क्षमता वाढविणे. ठरावीक ऋतूमध्ये मिळणारा भाजीपाला वर्षभर वापरात आणणे.फळे व भाजीपाल्यामधील पोषणद्रव्ये टिकवणे.

निर्जलीकरणाचे फायदे : बुरशी तसेच सूक्ष्मजीवांपासून शेतीमालाचे दीर्घकाळपर्यंत रक्षण करता होते. साठवणक्षमता वाढविता येते. शेतीमालाच्या वजनात व आकारात घट होते. त्यामुळे शेतीमालाच्या वाहतूक व साठवणुकीवरील खर्चात बचत होते. विजेवर किंवा इतर इंधनावर चालणाऱ्या ड्रायरपेक्षा सोलर ड्रायर हा किफायतशीर आहे. किमान उपलब्ध साधनांमध्ये ड्रायरची उभारणी करता येते. त्यामुळे खर्च कमी असतो. सोलर ड्रायरमध्ये वाळविण्यासाठी ठेवलेल्या पदार्थांचे वारा, धूळ, माती या पासून संरक्षण होते. बाजारात उपलब्ध असणारे ग्रीन हाऊस सोलर ड्रायर हे बांबूपासून बनविलेल्या सोलर ड्रायरपेक्षा जास्त चांगल्या कार्यक्षमतेचे असतात. ते मुख्यत्वे विविध फळे, मासे, कॉफी असे खाद्यपदार्थ वाळविण्यासाठी वापरतात.

यंत्रामध्ये वाळविता येणारी फळे व भाजीपाला : फळे : फणसाचे गर, पपई, आंबा, चिक्कू, द्राक्षे, केळी, सफरचंद, आवळा इ. भाजीपाला : मेथी, कढीपत्ता, टोमॅटो, मिरची, पुदिना, पालक, कांदा, लसूण इ.

## थोडक्यात



### वसंतदादा पाटील महाविद्यालयाच्या रासेयो शिबिरात आरोग्य तपासणी

पाटोदा । प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या मौजे चुंबळी येथे सुरु असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरात २९ जानेवारी रोजी आरोग्य तपासणी शिबीर उत्साहात संपन्न झाले.आरोग्य तपासणी शिबिरात तज्ज्ञ म्हणून पाटोदा शहरातील डॉ. के. टी. सानप, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. भारती सुभाष उपस्थित होते. अध्यक्षस्थानी सरपंच प्रतिनिधी प्रवीण पवळ होते तर व्यासपीठावर ग्रामविकास अधिकारी परमेश्वर सावंत होते.

शिबिरात डोंगरकिन्ही येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या चमूने उपस्थित विद्यार्थिनी व महिलांच्या रक्ताचे नमुने विविध तपासण्यांकरिता संकलित केले. याप्रसंगी डॉ. के. टी. सानप यांनी महिलांचे आरोग्य यात विशेषतः रक्तक्षय याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. सुभाष भारती यांनी रक्तक्षय होऊ नये म्हणून घ्यावयाची काळजी व पोषक व संतुलित आहार याविषयी मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सय्यद शानूर यांनी केले. आभार डॉ. कृष्णा नागरे यांनी मानले. आरोग्य तपासणी शिबिराच्या यशस्वितेसाठी कार्यक्रमाधिकारी प्रा. मनिषा गाढवे, डॉ. जालिंदर लोणके, डॉ. चंद्रशेखर बनसोडे, डॉ. दिनेश राऊत यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास जि. प. प्राथमिक शाळेचे सहशिक्षक शिंदे, ग्रामपंचायत सदस्य भाऊसाहेब पवने यांच्यासह चुंबळीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

### वंजारी वधु-वर पालक संवाद बैठक

बीड : मातृभुमी प्रतिष्ठान संचलित वंजारी विश्व वधु वर नोंदणी महासंघाच्या वतीने नुकताच डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड ,बीड येथे १२ जानेवारी २०२५ रोजी १७ वा राज्यस्तरीय वंजारी वधु वर परिचय मेळावा उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्यास वधु वर व पालकांनी उत्तम प्रतिसाद दिला. ज्या पालकांना आपल्या वधु वराची नवीन नोंदणी करायची आहे अशांनी रविवार दिनांक ०२ फेब्रुवारी २०२५ रोजी कृष्णाई नगर, आगलावे इस्टेट, अंकुश नगर, जुना चऱ्हाटा रोड, बीड येथे बैठकीचे आयोजन केले असून या बैठकीस कार्यकारिणी सदस्य तसेच राज्यस्तरीय मेळाव्यास वधु वराची नोंदणी केलेल्या पालकांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजक समितीच्या वतीने डॉ. संजय तांदळे , रामदास हंगे, उत्तमराव मिसाळ, मोहनराव सिरसाठ, प्रा. डी. जी. तांदळे, पांडुरंग जायभाये, बाजीराव ढाकणे, आत्माराम वाव्हळ, प्रा बाळासाहेब नागरगोजे, उध्दव लाड, बी. बी .जायभाये यांच्यासह मान्यवरांनी केले आहे.

### ॲड. सुरेश काळे यांना महाराष्ट्र गौरव सन्मान पुरस्कार

परतुर : परतुर वकील संघाचे सचिव ॲड.सुरेश काळे यांना सुप्रीम ह्युमन राईट इंटेलिजन्स इंडिया या संस्थेमार्फत महाराष्ट्र गौरव पुरस्कार मराठवाडा विभागातून घोषित झाला आहे. अहो रात्र दिन, दुबळ्या ,वंचित ,शोषित ,पीडित आदिवासी समूहासाठी पोट तिडकीने व स्वतःला झोकून देऊन काम करणारे असे सर्वसामान्यतून उभा राहिलेले नेतृत्व ॲड.सुरेश काळे यांना नुकताच महाराष्ट्र गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. या अनुषंगाने परतुर मंठा विधानसभेचे लाडके आमदार मा.बबनरावजी लोणीकर साहेब यांनी त्यांचा भ्रमणध्वनी द्वारे अभिनंदन केले तसेच विविध क्षेत्रातील लोकांनी व मित्रमंडळींनी त्यांना या पुरस्काराबद्दल खूप खूप शुभेच्छा दिल्या सर्वच स्तरातून या पुरस्काराची चर्चा केली जात आहे. येणाऱ्या ०२ मार्च २०२५ रोजी नाशिक येथे या पुरस्कार वितरणाचे कार्यक्रमांचे आयोजन केलेले आहे.

**जाहीर प्रगटन**

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १६०/२०२५**

CNR No. MHBI0200002972025

**वैजनाथ राम जाधव व इतर २ वि. निरंक**

**मार्फत ॲड. सी बी. जाधव**

अर्जदार

१. वैजनाथ पि राम जाधव, वय ३९ वर्षे, धंदा ड्रायव्हर, रा. देवी मंदिर, खासबाग, बीड ता. जि. बीड,२. उषा भ्र. रंदावन माने, वय ३७ वर्ष, धंदा घरकाम, रा नानज ता. जामखेड जि. अहमदनगर, अविनाश पि. राम जाधव, वय-३४ वर्ष, धंदा मजुरी, रा. देवी मंदीर, खासबाग, बीड ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलग २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत. वरील अर्जदार क्र. १ ते ३ यांनी या न्यायालयात मयत काशिबाई उर्फ अर्चना भ्र. राम जाधव यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे ज्याअर्थी मयत काशिबाई उर्फ अर्चना भ्र. राम जाधव यांचा मृत्यु दिनांक १०/१२/२०२४ रोजी मदनसुरी ता. निलंगा जि. लातुर येथे त्यांचा मृत्यु झाला वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र. १ व ३ हे मयताचे मुले असून अर्जदार क्र. २ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. मयताचे पती या पुर्वीच मयत झाले आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत मयत काशिबाई उर्फ अर्चना भ्र. राम जाधव याचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन दैनिक 'राज्य लोकतंत्र मध्ये प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कात त्याचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख ०१/०३/२०२५

आज दिनाक २८ माहे जानेवारी २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**क. लिपीक** (शिक्का)

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर, बीड

# गंगाई-बाबाजी महोत्सव हा राज्यातील अत्यंत दिमाखदार सोहळा-कल्याणी चौधरी





आष्टी । प्रतिनिधी

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा आष्टी - पाटोदा - शिरूर चे माजी आमदार, शिक्षणमहर्षी भीमराव धोंडे साहेब यांच्या आई वडिलांच्या नावाने गेली १९ वर्षे सुरू असलेला गंगाई - बाबाजी महोत्सव आणि गंगाई - बाबाजी आदर्श पुरस्कार वितरण सोहळा हा राज्यातील अत्यंत आगळावेगळा आणि दिमाखदार सोहळा आहे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री कल्याणी चौधरी यांनी केले. भगवान महाविद्यालय आष्टीच्या वतीने आयोजित गंगाई - बाबाजी महोत्सवानिमित्त दिल्या जाणाऱ्या गंगाई - बाबाजी आदर्श पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तथा आष्टी - पाटोदा - शिरूरचे माजी आमदार, शिक्षणमहर्षी भीमराव धोंडे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या पुरस्कार वितरण सोहळ्यास पाटोदा पंचायत समितीच्या माजी सभापती सुवर्णाताई लांबरुड, ह. भ. प. दिनकर महाराज तांदळे, शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे डॉ. अजय दादा धोंडे, अभय दादा धोंडे, प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, रामराव खेडकर, रामदास बडे, पांडुरंग नागरगोजे, रत्नदीप निकाळजे, बबनराव आवटे, सुदाम काका झिंजुर्के, सरपंच दादा जगताप, अन्सार शेख, अशोक साळवे, ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, सिने पत्रकार भगवान राऊत, रावसाहेब लोखंडे, बाळासाहेब शेकडे, महारुद्र खेडकर, सदाशिव तुपे, संतोष गोल्हार, राजेंद्र धोंडे, आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी बोलताना सिने अभिनेत्री कल्याणी चौधरी म्हणाल्या की, माजी आमदार भीमराव धोंडे साहेब यांनी बीड जिल्ह्यातील आष्टी - पाटोदा - शिरूर या ग्रामीण भागातील शेतकरी, ऊस तोडणी कामगार व गोरगरिबांच्या मुला - मुलींच्या शिक्षणासाठी शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करून या दुष्काळी भागामध्ये शिक्षणाची गंगा आणली. त्यामुळे हजारो तरुण तरुणींना शिक्षण घेऊन स्वताच्या पायावर उभे राहता आले. त्यामुळे मा. आ. भीमराव धोंडे शिक्षण महर्षी या नावाने संबोधले जावे. असे त्यांचे शैक्षणिक क्षेत्रात महान कार्य आहे. त्यांच्या आई-वडिलांच्या चिरंतन स्मृती जपण्यासाठी ते गेली १९ वर्षे गंगाई - बाबाजी महोत्सवाच्या माध्यमातून समाजातील गुनिजनांचा गंगाई बाबाजी आदर्श पुरस्कार देऊन सन्मान करतात. समाजातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या गुणवंतांच्या पाठीवर पुरस्काराच्या रूपाने शाबासकीची थाप देतात. या पुरस्कारामुळे विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांना आणखी जोमाने काम करण्याची प्रेरणा, प्रोत्साहन आणि बळ मिळते. त्यामुळे अशा कार्यक्रमाची समाजाला गरज आहे असे त्या म्हणाल्या. माजी आमदार भीमराव धोंडे साहेब म्हणाले की, विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या पुरस्कार प्राप्त मान्यवर व्यक्तींकडून विद्यार्थी विद्यार्थिनींनी आपल्या आवडीच्या क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करण्याची प्रेरणा घ्यावी. आपल्या जन्मदात्या आई-वडिलांची मनोभावे सेवा करावी. ज्यांनी आपल्याला हे जग दाखविले त्या आपल्या आई - वडिलांना दैवत मानावे. विद्यार्थी, विद्यार्थिनींना आपले चांगले भवितव्य घडविण्यासाठी शिक्षणाशिवाय दुसरा कुठलाही पर्याय उपलब्ध नाही. आगामी काळात चांगला समाज घडविण्यासाठी सर्वांनी सामूहिकपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे ते म्हणाले. 'वाचाल तर वाचाल आणि शिकेल तो टिकेल' असेही ते शेवटी म्हणाले. सर्व पुरस्कार प्राप्त गुणवंतांचे त्यांनी कौतुक केले व भविष्यकालीन वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी ह. भ. प. पांडुरंग जाधव गुरुजी, प्राचार्य निंभोरे सर व साहित्यिक प्रा. डॉ. सुधाकर शेलार या पुरस्कार प्राप्त मान्यवरांनी आपली प्रातिनिधीक स्वरूपातील मनोगते व्यक्त केली. प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य डॉ. ज्ञानदेव वैद्य यांनी उपस्थितांचा परिचय करून दिला. उपप्राचार्य डॉ. अप्पासाहेब टाळके, प्रा. श्रीकांत धोंडे व प्रा. संभाजी झिंजुर्के यांनी सूत्रसंचालन केले. तर प्रा. बापू तोरडमल यांनी आभार मानले. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व गंगाई - बाबाजी यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास प्रारंभ झाला. तर सामूहिक राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला. या कार्यक्रमास प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थिनी, पुरस्कार प्राप्त, गुणवंत, त्यांचे नातेवाईक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते व आष्टी पंचक्रोशीतील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिवसंग्राम जिल्हा कार्यकारिणी बरखास्त

### नूतन जिल्हाध्यक्षपदी प्रा.सुभाष जाधव यांची निवड

बीड । प्रतिनिधी



शिवसंग्राम संघटनेची बीड जिल्हा कार्यकारिणी बैठक शिवसंग्राम भवन बीड येथे शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या अध्यक्षतेखाली व प्रदेश उपाध्यक्ष श्री. प्रभाकर अप्पा कोलांगडे यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवार, दि. ३० जानेवारी रोजी संपन्न झाली.येत्या काळात येऊन ठेपलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था व बीड नगर पालिका निवडणूक अनुषंगाने तसेच पक्षबांधणी विस्तार अनुषंगाने जिल्हा कार्यकारिणी बरखास्त करून काल शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ.ज्योतीताई मेटे यांनी नूतन जिल्हाध्यक्षपदी प्रा.सुभाष जाधव सर, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे, बीड तालुकाध्यक्ष पंडित माने, बीड तालुका उपाध्यक्षपदी दिनकर शेळके व बीड शहराध्यक्षपदी सुहास पाटील यांच्या निवडी जाहीर केल्या.उर्वरित निवडी यथावकाश जाहीर करण्यात येतील असे यावेळी सांगण्यात आले.

याप्रसंगी जिल्ह्यातील उपस्थित पदाधिकारी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना डॉ. ज्योतीताई मेटे यांनी सांगितले की,आगामी काळात झोकून काम करण्याची तयारी नवनिर्वाचित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी ठेवा .प्रत्येकाने जबाबदारी ओळखून जबाबदारीने काम करावे.नवनियुक्त पदाधिकाऱ्यांकडून १००% कामाची अपेक्षा आहे.नगरपालिका पंचायत समिती जिल्हा परिषद निवडणुका समोर ठेवून या निवडी करण्यात आलेले आहेत. शिवसंग्राम अंतर्गत आगामी काळात नवीन आघाडी तयार केल्या जातील. ग्रामीण व शहरी भागात जास्तीत जास्त कार्य करावे. येत्या काळात जास्तीत जास्त पदाधिकारी कार्यकर्त्यांचे जाळे बीड जिल्ह्यात करावयाचे आहे. पक्षाची शिस्त पाळा.पक्षामध्ये एक कुटुंब म्हणून वागा. तरुणांनी बदल करायची हिंमत दाखवली पाहिजे सकारात्मकता, आक्रमकपणा कार्यकर्त्याने अंगी बनवावा. सदैव हिरोच्या भूमिकेत रहा,आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती संपूर्ण जागा स्वहिमतीवर लढायच्या आहेत मराठा आरक्षण, अरबी समुद्रातील छत्रपती शिवरायांचे स्मारक,शेतकऱ्यांना निवृत्ती वेतन देण्याकरिता यापुढील वाटचाल करायचे आहे. सोशल मीडियावर सतर्क रहा,शिवसंग्रामचा झेंडा डौलाने फडकवत दिलेल्या जबाबदारीला जागा, संघटनेला व स्वतःला मोठे करा अशा स्पष्ट शब्दांत उपस्थित कार्यकर्त्यांना शिवसंग्रामच्या अध्यक्ष डॉ.ज्योतीताई मेटे यांनी मार्गदर्शन केले.




### प्रशासनाच्या लोकेशनमुळे नदीपात्रामधून वाळू उपसा जोरात सुरू

परतुर/प्रतिनिधी

परतुर तालुक्यातील पोलीस प्रशासन व महसूल प्रशासन या दोघांच्याही लोकेशन मुळे वाळू माफिया २४ तास नदी पात्रातून वाळू उपसा सुरू आहे.

भरधाव वेगाने चाललेल्या ट्रॅक्टर मुळे नागरिकांच्या मुलाबाळांच्या जीवितास हानी होण्याची दाट शक्यता आहे.

मागील काही महिन्यापासून रात्रंदिवस जेसीबी द्वारे तीन ते चार ट्रॅक्टर नदीपात्रातून अवैध वाळू उपसा करीत आहेत, गावातील नागरिकांनी महसुल विभाग व पोलीस विभागाला फोन द्वारे माहिती देऊन सुद्धा महसूल विभाग व पोलीस प्रशासन कुठल्याही प्रकारची ठोस कार्यवाही करत नाही, महसुल विभाग व पोलीस प्रशासन विभाग जाणून बुजून कानाडोळा करत असल्याचे दिसून येत आहे,काही अधिकाऱ्यांच्या हप्ते खोरी पणामुळे अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफीयांना कुठल्याही प्रकारचा धाक राहिला नाही. रात्रंदिवस भर वेगाने चालणारे ट्रॅक्टर गावातील मुला बाळांचा जीव घेऊ शकतात यांच्यावर वेळेत कारवाई केली नाही तर गावातील नागरिकांचा जीव जाऊ शकतो याला संपूर्णपणे महसूल विभाग व पोलीस प्रशासन जबाबदार राहील. असे बोलले जात आहे याप्रकरणी जिल्हाधिकारी डॉ .श्रीकृष्ण पांचाळ व अप्पर जिल्हाधिकारी यांनी तत्काळ लक्ष देण्याची मागणी नागरिकाकडून करण्यात येत आहे.



परतुर येथील माजी नगरसेवक शरीफ कुरेशी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत प्रवेश केला. त्यावेळी त्यांचे स्वागत करताना जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण उपस्थित अर्शद बागवान, सलीम बागवान, सोमनाथ चौधरी आदी.

## सोयाबीन खरेदीला महिनाभर मुदतवाढ द्यावी

### ५० टक्केच खरेदी झाली असुन ३२ हजार शेतकरी वंचित राहण्याचा धोका

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील नोंदणी केलेल्या एकुण सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांपैकी केवळ ५० टक्के शेतकऱ्यांच्या सोयाबीन खरेदीची प्रक्रिया पुर्ण झाली असुन उर्वरित शेतकऱ्यांच्या ५० टक्के शेतकऱ्यांचे ३१ जानेवारी पर्यंत इतक्या कमी कालावधीत खरेदी प्रक्रिया पुर्ण होणे शक्यच नाही. त्यामुळे सोयाबीन खरेदीला आणखी महिनाभर मुदतवाढ देण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

बीड जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांपैकी ४४ हजार ७७४ शेतकऱ्यांनी नाफेड कडे सोयाबीन खरेदीसाठी ऑनलाईन अर्ज केले होते. त्यानंतर १५ ऑक्टोबर २०२४ पासून नाफेड च्या वतीने बीड जिल्ह्यातील ३० केंद्राद्वारे सोयाबीन खरेदी सुरुवात झाली होती . आज ३१ जानेवारी २०२५ शेवटची तारीख असताना आतापर्यंत केवळ १२ हजार ५००शेतकऱ्यांची ३ लाख ४१ हजार क्विंटल सोयाबीनची खरेदी झाली असून गुरुवारी ३० जानेवारी पर्यंत मुदतवाढ मिळाली नसल्याने जर आज मुदत वाढ मिळाली नाही तर बीड जिल्ह्यातील ३२ हजार शेतकऱ्यांना खुल्या बाजारात बेभाव सोयाबीन घालावी लागणार आहे .बीड जिल्ह्यातील यंदा ३ लाख ८७ हजार ९३९ हेक्टरवर सोयाबीनचा पेरा झालेला आहे .सरासरी हा पेरा २ लाख २६ हजार २३४ हेक्टर असतो. यंदा मात्र सरासरीच्या तुलनेत १७१ टक्के झाला आहे. त्यामुळे जिल्ह्यात सोयाबीनचे उत्पन्न वाढले असल्याने तब्बल ४४ हजार शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून शासनाने केवळ १२ हजार ५०० शेतकऱ्यांचीच सोयाबीन खरेदी केली आहे. त्यामुळे आज मुदत वाढ मिळणे गरजेचे आहे. शासनाच्या वतीने सोयाबीन खरेदी केली जात आहे शासन प्रति क्विंटल ४८९२ रुपये भाव देत आहे .खुल्या बाजारात व्यापारी मात्र ४००० ते ४४०० प्रति क्विंटल सोयाबीन खरेदी करत असल्याने क्विंटल मागे शेतकऱ्यांना ८०० ते ५०० रुपये तोटा सहन करावा लागत आहे.


## राशन दुकानांवर गहू ऐवजी ज्वारी; शासनाचा हा निर्णय रोजेदारांवर पडणार भारी!

### सणासुदीच्या काळात जनतेला सोसावी लागेल अतिरिक्त आर्थिक झळ -युसूफ़

बीड । प्रतिनिधी

शासनाकडून या महिन्यापासून राशन दुकानांवर गहू ऐवजी ज्वारी पाठविण्यात येत असल्याने शासनाचा हा निर्णय रोजेदारांवर भारी पडणार असून शासनाला जर राशन कार्ड धारकांना ज्वारी द्यायचीच असेल तर ती गव्हा ऐवजी नको तांदळा ऐवजी देण्याची मागणी होण्याची शक्यता दिसून येत आहे. राशन दुकानावरून गहू बंद केल्यास सर्वसामान्य गोरगरीब जनतेला सणासुदीच्या काळात अतिरिक्त आर्थिक झळ सोसावी लागेल असे मत मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून व्यक्त केले आहे.





याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, शासनाने राशन दुकानांवरून राशन कार्ड धारकांना आता गव्हा ऐवजी ज्वारी देण्याचा निर्णय घेतला असून जिल्ह्यातील राशन दुकानांवर गहू न येता त्या ऐवजी ज्वारी आली आहे. शासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे सर्वसामान्य गोरगरीब राशन कार्ड धारकांमध्ये मोठ्या प्रमाणात उलट-सुलट चर्चा होऊ लागली आहे. त्यातच इस्लाम धर्माचा रमजान महिना पुढील मार्च महिन्याच्या दोन तारखेपासून सुरू होणार आहे. रमजान महिन्यात मुस्लिम समाजातील महिला, पुरुष, तरुण-तरुणी, आबालवृद्ध सर्वच जण रमजानचे रोजे धरतात. रमजान महिन्यात रोजा असताना मुस्लिम समाज शक्यतो पहाटे सहरीसाठी तसेच दिवस मावळताना रोजा सोडल्यानंतर जेवणासाठी गव्हाच्या पोळ्यांचाच जास्त उपयोग करतो. मुस्लिम समाजातील रोज़ेदार रमजानच्या महिन्यात ज्वारीची भाकर बनवीत नाही आणि खातही नाही. नेमके याच काळात शासनाकडून राशन दुकानांवर गव्हा ऐवजी ज्वारी पाठविण्यात येत असल्याने मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त होऊ लागली आहे. याशिवाय येत्या एप्रिल महिन्यात भारतरत्न संविधान रचयिते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती सुद्धा येत आहे. यामुळे फेब्रुवारी ते एप्रिल या तीन महिन्याच्या कालावधीत मोठ्या संख्येने असलेल्या दलित-मुस्लिम समाजाच्या भावना लक्षात घेता शासनाने गहू बंद करून ज्वारी देऊ नये तसेच शासनाकडे जर ज्वारी मोठ्या प्रमाणात शिल्लक असेलच तर शासनाने ती गव्हा ऐवजी न देता तांदळा ऐवजी दिली तर एक वेळ ठीक आहे परंतु असे न करता गव्हा ऐवजी ज्वारी पाठविण्यात येऊ नये. अशी मागणी होण्याची शक्यता आहे. शासनाने याकडे जातीने लक्ष देऊन ऐन रमजान महिन्याच्या तोंडावर तसेच आगामी आंबेडकर जयंतीकडे लक्ष देऊन अन्नधान्याचा पुरवठा करावा नसता जनतेतून मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त होणार असल्याचे चित्र दिसून येत आहे. कारण राशन दुकानावरून गहू बंद केल्यास ऐन सणासुदीच्या काळात बाजारपेठेत गव्हाचे दर वाढतील. ज्यामुळे सर्वसामान्य गोरगरीब जनतेला अतिरिक्त आर्थिक झळ सोसावी लागेल असे मत मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून व्यक्त केले आहे.










# खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक बाबुराव आडे यांचा सेवा गौरव समारंभ संपन्न

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य बाबुराव आडे हे शासकीय वयोमानानुसार दि.३१/०१/२५ शुक्रवार रोजी सेवा निवृत्त झाले आहेत.त्यांचा सेवागौरव समारंभ संपन्न झाला.या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलुरकर उपस्थित होते.तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य,मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा.चंद्रकांत मुळे,प्रमुख उपस्थिती म्हणून केंद्रीय कार्यकारिणी सदस्या डॉ.कल्पनाताई चौसाळकर, विद्यासभा उपाध्यक्ष तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य उमेश जगताप, वद्यालयाचे उपमुख्याध्यापक विवेक जोशी सत्कारमूर्ती बाबुराव आडे,गंगासागर आडे उपस्थित होते. याशिवाय केंद्रीय कार्यकारिणी सदस्य,सीबीएसईचे अध्यक्ष,खोलेश्वर प्राथमिक ◀◀ पान ३०वर


































This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# लग्नाच्या बहाण्याने पावणेतीन लाखांची फसवणूक; तीन महिलांसह पाच जणांना अटक

**सातारा । प्रतिनिधी**

राज्यात फसवणुकीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. राज्यातील वेगवेगळ्या भागातून फसवणुकीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता लग्नाच्या बहाण्याने एकाची सुमारे पावणेतीन लाखांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी तीन महिलांसह पाच जणांना फलटण ग्रामीण पोलिसांनी अटक केली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार, या गुन्ह्यातील फिर्यादी हे ४४ वर्षाचे अविवाहित पुरुष असून, व्यवसायाने शेतकरी असल्याने त्यांचे लग्न जमत नव्हते. लग्नासाठी प्रयत्न करीत असताना त्यांच्या ओळखीच्यांनी त्यांना छाया साठे (रा. आळंदी, जि. पुणे) या महिलेचा फोन नंबर देऊन त्या लग्न जुळवण्याचे काम करत असल्याचे सांगितले. त्यानुसार फिर्यादींनी छाया साठे यांच्याशी संपर्क साधल्यानंतर छाया साठे व तिची साथीदार जयश्री दत्तू शिंदे (रा. चिखली, ता. हवेली, जि. पुणे) यांनी फिर्यादीच्या अडचणीचा गैरफायदा घेऊन फसवणूक करण्याच्या उद्देशाने दोन मुले व विवाहित असलेल्या दीपाली प्रभू जाणे (रा. पाटणादेवी रोड, रोशन नगर, ता. चाळीसगाव, जि. जळगाव) या महिलेशी संगनमत करून तिचे फिर्यादीशी लग्न आळंदी येथे लावून दिले. त्या मोबदल्यात त्यांनी फिर्यादीकडून एकूण पावणेतीन लाख रुपये रोख स्वरूपात घेतले होते.

दरम्यान हे करीत असताना छाया साठे व जयश्री दत्तू शिंदे यांनी त्यांची साथीदार दिपाली प्रभू जाणे हिला मुले व विवाहित असल्याचे फिर्यादीस लग्न झाल्यानंतर काही दिवसांनी कळवून तेथून निघून येण्यास सांगितले होते. त्यानुसार दिपाली ही लग्नानंतर सहा दिवसांतच फिर्यादीस खरी हकीकत सांगून तेथून निघून गेली. पोलिसांच्या पथकाने फलटण बस स्थानकात संशयितांना ताब्यात घेऊन फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंद केला. या गुन्ह्यात एकूण पाच जणांना अटक करण्यात आली आहे.

पोलीस उपनिरीक्षक शिवानी नागवडे अधिक तपास करीत आहेत. पोलीस अधीक्षक समीर शेख, अप्पर पोलीस अधीक्षक वैशाली कडूकर, फलटणचे उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल धस यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुनील महाडिक, पोलीस उपनिरीक्षक शिवानी नागवडे, दीपक पवार, पोलीस अंमलदार तुषार आडके, अमोल अडसूळ यांनी ही कारवाई केली.

खोटे नातेवाईक बनून घातला गंडा

फिर्यादीस फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी जयश्री शिंदे व छाया साठे यांना पैसे मागितले. त्यावर त्या दोघींनी दुसरी मुलगी दाखवते, असे सांगून आणखी दीड लाख रुपयांची मागणी केली. त्यास फिर्यादीने तयारी दर्शवल्यानंतर दिनांक २७ जानेवारी रोजी जयश्री शिंदे या शशिकला तुकाराम जाधव (रा. चिखली, ता. मंगळरुपीर, जि. वाशिम) यांना नवरी मुलगी म्हणून घेऊन फलटण येथील एसटी स्टँडवर आल्या. त्यावेळी त्यांच्यासोबत गजानन नामदेव डाखोरे, सुमित्रा गजानन डाखोरे व गोकुळ ज्ञानदेव लोंढे (तिघेही रा. तांदुळवाडी ता. जि. सोलापूर) उपस्थित होते. फलटण स्टँडवर फिर्यादी गेल्यानंतर संशयित नवरी मुलीचे खोटे नातेवाईक बनून पुन्हा फसवणूक करीत असल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादींनी ही बाब पोलीस निरीक्षक सुनील महाडिक यांना कळविली.

गैरफायदा घेत लुबाडण्याचा नवीन फंडा

सध्या ग्रामीण भागात स्त्री-पुरुष गुणोत्तर प्रमाण विषम असून पुरुषांच्या तुलनेत महिलांचे प्रमाण कमी झाल्यामुळे केवळ शेती करणाऱ्या व नोकरी नसणाऱ्या युवकांची लग्ने जमण्यास अलीकडील काळात अडचण निर्माण होत आहे. नेमक्या याच अडचणीचा गैरफायदा घेऊन लोकांची फसवणूक करून पैसे लुबाडण्याचा नवीन फंडा निघाला आहे. या घटनेतील संशयितांचे फोटो पाहून यांच्यापैकी कोणी लग्न लावून देण्याचे अमिष दाखवून कोणाची फसवणूक केली असल्यास त्यांनी तत्काळ फलटण ग्रामीण पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन फलटण ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनील महाडिक यांनी केले आहे.

# 'कायदा-सुव्यवस्था सुस्थितीत राहण्यासाठी पोलीस दलाने नेहमीच प्रयत्नशील राहावं'; अजित पवार यांच्या सूचना

**बारामती । प्रतिनिधी**

राज्यात कायदा व सुव्यवस्था सुस्थितीत राहण्यासाठी पोलीस दलाला सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन सुसज्ज करणे ही राज्य शासनाची प्राथमिकता आहे, असे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी सांगितले. सर्वांच्या प्रयत्नातून आगामी काळात कायदा व सुव्यवस्थेत अग्रेसर व सुरक्षित महाराष्ट्र निर्माण करुया, असा संकल्पही त्यांनी व्यक्त केला.




पोलीस उपमुख्यालय बऱ्हाणपूर येथे पोलीस विभागाकरीता ४ स्कॉर्पिओ वाहनांचे लोकार्पण तसेच तालुक्यातील नागरिकांना त्यांचा चोरी गेलेला मुद्देमाल वितरण समारंभाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पोलीस अधीक्षक पकंज देशमुख, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उप विभागीय अधिकारी वैभव नावडकर, उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बप्पा बहीर यांच्यासह अनेकजण उपस्थित होते.

अजित पवार म्हणाले, ग्रामीण भागात ड्रोन फिरत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी व भीती लक्षात घेऊन जिल्हा ग्रामीण पोलीस दलालाकरीता ३८ लाख रुपयांच्या दोन ड्रोन प्रतिबंधक बंदूक (अँटी ड्रोनगन) खरेदीकरीता मंजूरी देण्यात आली आहे. जिल्ह्याचे कार्यक्षेत्र विचारात घेऊन आणखीन दोन ड्रोन प्रतिबंधक बंदूक उपलब्ध करुन देण्यात येईल. बऱ्हाणपूर परिसरात उभारण्यात आलेल्या पोलीस उपमुख्यालयात प्रशासकीय इमारत, पोलीस अधीक्षक निवासस्थान, उपअधीक्षक निवासस्थान, सायबर पोलीस ठाणे, विश्रामगृह, प्रशिक्षण केंद्र, बहुद्देशीय सभागृह, वसतिगृह, निवासस्थाने आदी इमारतींचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहेत. आता अत्याधुनिक आणि आतंरराष्ट्रीय दर्जाची धावपट्टी, नेमबाजी मैदानाचे (शुटिंग रेंज) काम सुरु आहे.

विविध गुन्ह्याचा शोध लावण्याकरीता श्वानाची भूमिका महत्त्वपूर्ण असते. त्यामुळे गोजुबावी श्वान प्रशिक्षक केंद्राच्या इमारतीचे बांधकाम सुरु करण्यात आले आहे. बारामती तालुका पोलीस दलासाठी अजून २ स्कॉर्पिओ वाहने लवकरच उपलब्ध करुन देण्यात येतील. नागरिकांची सुरक्षा अबाधित ठेवण्याकरीता अनुसूचित प्रकाराला आळा घालण्यासोबतच कायदा व सुव्यवस्था सुस्थितीत राहण्यासाठी पोलीस दलाने नेहमीच प्रयत्नशील राहावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

# पुण्यात भोंदूबाबाने वृद्ध महिलेला फसवलं; २९ लाख रुपयांचा गंडा, पोलिसात गुन्हा दाखल

पुणे : मुलीवरची काळी जादू काढतो म्हणत ज्येष्ठ महिलेला लाखो रुपयांचा गंडा घातल्याची घटना पुण्यातून उघडकीस आली आहे. भोंदूबाबाने ज्येष्ठ महिलेला तब्बल २९ लाख रुपयांचा गंडा घातल्याचे समोर आले आहे. पुणे शहरातील बालेवाडी भागात ही घटना घडली असून पीडित महिलेने याबाबत पोलिसांत फिर्याद दाखल केली. त्यावरून चतु:शृंगी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांपूर्वी भिवंडीतही एका महिलेला भोंदूबाबाने फसवल्याची घटना घडली होती. त्यानंतर, संबंधित भोंदूबाबावर गुन्हाही दाखल करण्यात आला होता. विशेष म्हणजे महाराष्ट्र हे जादूटोणा विरोधी कायदा करणारे हे देशातील पहिले राज्य आहे. मात्र, आजही भोंदूबाबा आणि तांत्रिक व मात्रिकांच्या नादी लागून काहीजण मंडळी आपलं नुकसान करुन घेतात. काही दिवसांपूर्वी एका भोंदूबाबाच्या सांगण्यावरुन हत्येसारखा गंभीर गुन्हा देखील घडल्याचे समोर आले होते.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुण्यातील बालेवाडी परिसरात राहत असलेल्या ज्येष्ठ महिलेला डिसेंबर महिन्यात एका अनोळखी व्यक्तीने फोन केला. त्यावेळी या व्यक्तीने तुमच्या घरावर दोष असल्याचे सांगितले. त्या भोंदू बाबाने संबंधित महिलेला तुमच्या घरावर वास्तुदोष आहेत, तसेच तुमच्या मुलीमधील दोष काढून देतो अशी खोटी बतावणी केली. त्यानंतर महिलेला जादूटोणा करण्याच्या जाळ्यात ओढून तिला काळी जादू काढून देतो असे सांगितले. या दोषामुळे घरावर असलेले संकट दूर करण्यासाठी काही पूजा कराव्या लागतील असे सांगून महिलेला ऑनलाइन पद्धतीने पैसे देण्यास सांगितले होते. या भोंदू बाबाच्या मागणीनुसार महिलेने आरोपीच्या बँक खात्यात वेळोवेळी २८ लाख ७७ हजार रुपये जमा केले. मात्र, त्यानंतर जेव्हा त्या महिलेने त्या व्यक्तीला संपर्क करायचा प्रयत्न केला, तेव्हा समोरून काही उत्तर आले नाही. या घटनेमुळे आपली फसवणूक झाल्याचे महिलेच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी थेट पोलिसात धाव घेतली. दरम्यान, याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेत पुढील तपास सुरू केला आहे.

# चांदीच्या अंगठ्यांना सोन्याचा मुलामा सोनाराची लाखाची फसवणूक; ४ जणांना बेड्या

पुणे : चांदीच्या अंगठ्यांना सोन्याचा मुलामा लावून त्यावर बनावट हॉलमार्क टाकत सोनाराची फसवणूक करणार्या चौघांना चंदननगर पोलिसांनी अटक केली आहे. आरोपींनी संगणमताने ही फसवणूक केली आहे. आरोपींकडून चार बनावट अंगठ्या जप्त करण्यात आल्या आहेत. ओमप्रकाश शामसुंदर परदेशी (५८, रा. वडगावशेरी), फय्याज चांद सय्यद (३५, रा. वडगाव शेरी), आरिफ खलील शेख (४१, रा. येरवडा), शरण माणिकराव शिलवंत (४६, रा. धनकवडी) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत ३५ वर्षीय व्यावसायिकाने फिर्याद दिली आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार, फिर्यादी यांचे वडगावशेरी भागात सोने खरेदी विक्रीचे दुकान आहे. काही दिवसांपूर्वी रिक्षामधून दोघेजण त्यांच्याकडे आले. त्यांनी सोन्याच्या अंगठ्या असल्याचे भासवून ४ अंगठ्या गहाण ठेवून त्याबदल्यात एक लाख रुपये घेतले. या अंगठ्या बनावट असल्याचे लक्षात आल्यानंतर सोनाराने पोलिसांकडे धाव घेतली. त्यानूसार चंदननगर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक सीमा ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने आरोपींचा शोध घेतला. तांत्रिक तपासावरून आरोपी परदेशीला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडे केलेल्या तपासावरून उर्वरीतल तिघांना ताब्यात घेतले. त्यावेळी चौघांनी संगणमताने हा गुन्हा केल्याचे समोर आले.

आरोपी शेख हा शिलवंत याच्याकडून या बनावट अंगठ्या घेत होता. तर, परदेशी आणि सय्यद या अंगठ्या विकून फसवणूक करीत होते. त्यांनी आणखी कुणाची फसवणूक केली आहे का, याबाबत पोलीस तपास करीत आहेत. पोलीस उपायुक्त हिम्मत जाधव, सहायक आयुक्त प्रांजली सोनवणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सीमा ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक दत्तात्रय लिगाडे, दत्तप्रसाद शेडगे याच्यासह पथकाने ही कामगिरी केली.

उच्चशिक्षित तरुणाची फसवणूक

गेल्या काही दिवसाखाली क्रिप्टोकरन्सीच्या माध्यमातून दर महिन्याला दहा टक्के परतावा मिळवून देण्याच्या आमिषाने पिंपरी- चिंचवड मधील उच्चशिक्षित तरुणाची ८० लाख २७ हजार रुपयांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी पिंपरी- चिंचवड सायबर पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. अविनाश सिंग आणि रवी ठाकूर अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. दोघेही मार्केटिंग आणि साखळी पद्धतीने उच्चशिक्षित तरुणांना त्यांच्या जाळ्यात ओढत होते. याबाबत सेमिनार घेऊन त्यांना कशा पद्धतीने परतावा मिळू शकतो. याबद्दल ते पटवून द्यायचे. पिंपरी- चिंचवड शहरातील उच्चशिक्षित असलेल्या तरुणाला क्रिप्टो करन्सीच्या माध्यमातून ८० लाख रुपयांना गंडा घातला आहे.

## कोथरुड परीसरात तिघांकडून तरुणावर हल्ला, प्रकृती चिंताजनक, हल्ल्याचं कारण अस्पष्ट


पुण्यातील कोथरुड परीसरात एका तरुणावर हल्ला झाल्याची घटना घडली आहे. कोथरुड परिसरातील आशिष गार्डन समोर तीन जणांकडून तरुणावर हल्ला करण्यात आला आहे. दरम्यान, हल्ल्याचं कारण अद्याप अस्पष्ट आहे. हल्ला करुन हल्लेखोर फारार झाला आहे. राहुल जाधव असं हल्ला झालेल्या तरुणाचं नाव आहे. दरम्यान, तरुणाची प्रकृती चिंताजनक असून, पुण्यातील खासगी रुग्णालयात तरुणावर उपचार सुरु आहेत.

कोथरुड परिसरातील आशिष गार्डन समोर राहुल जाधव या तरुणावर हल्ला झाल्याची घटना घडली आहे. या हत्येनंतर परिसरात खळबळ उडाली आहे. एकूण तीन जणांना हा हल्ला केल्याची माहिती मिळत आहे. या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर सध्या उपचार सुरु आहेत.

# ठाकरे गटाला खिंडार, शिंदेंचं ऑपरेशन टायगर; रविंद्र धंगेकरांसह पुण्यातील ३ माजी आमदार अन् ६ नेते संपर्कात?

मुंबई : राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाले असून आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणनिती आखली जात आहे. त्या दृष्टीने राजकीय पक्ष कामाला लागल्याचं पाहायला मिळत आहे. एकीकडे मुंबईत शिवसेना ठाकरे गटाने स्वबळाचा नारा दिलाय, तर दुसरीकडे शिवसेना शिंदे गटही अधिक्र सक्रीय होऊन शिवसेना ठाकरे गटाला धक्का देत आहे. काँग्रेस आणि ठाकरे गटातील पदाधिकारी आपल्या पक्षात घेण्याची स्पर्धाच महायुतीमध्ये सुरू झाल्याचं दिसून येतय. शिवसेना नेते आणि मंत्री उदय सामंत यांनी काही दिवसांपूर्वी ऑपरेशन टायगरसंदर्भात भाष्य करताना काही माजी आमदार व खासदार आमच्या संपर्कात असून लवकरच त्यांचा शिवसेनेत प्रवेश होईल असे म्हटले होते. त्यानुसार आता पडद्यामागून शिवसेनेचे ऑपरेशन टायगर सुरू असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात असून अनेक माजी आमदारांचा लवकरच शिवसेनेत प्रवेश होणार असून काँग्रेसचे माजी आमदार व पुण्यातील रविंद्र धंगेकर हेही धनुष्यबाण हाती घेणार आहेत.





शिवसेना नेते उदय सामंत यांच्या नेतृत्वाखाली ५ माजी आमदारांचा शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश होणार असून ते उदय सामंत यांच्या संपर्कात असल्याची वरिष्ठ सूत्रांची माहिती आहे. त्यामध्ये, २ काँग्रेस नेते आणि ४ माजी आमदार असून काँग्रेसचे रविंद्र धंगेकर यांचाही ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश होणार असल्याचे समजते. तर, काही दिवसांपूर्वी ठाकरेंच्या शिवसेना बैठकीत नाराज होऊन उठून गेलेले चंद्रकांत मोकाटेही ठाकरेंची साथ सोडणार असल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे काँग्रेसचे माजी आमदार रवींद्र धंगेकर व हुसेन दलवाई यांनी वर्षा बंगल्यावर जाऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेची आजच भेट घेतली. काँग्रेसचे दोन नेते एकनाथ शिंदेच्या भेटीला आल्याने राजकीय वर्तुळा चर्चेला उधाण आले असून अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. दरम्यान, हुसेन दलवाई यांनी पक्षप्रवेशाचे वृत्त फेटाळले असले तरी रविंद्र धंगेकर यांच्या भेटीमुळे त्यांच्या शिवसेना प्रवेशाची चर्चा कायम आहे.

पुण्यातील हे नेते शिंदेंच्या शिवसेनेच्या संपर्कात

१) रविंद्र धंगेकर, काँग्रेसचे माजी आमदार
२) महादेव बाबर, ठाकरे गटाचे माजी आमदार हडपसर ३) चंद्रकांत मोकाटे, कोथरूडचे माजी आमदार ठाकरे गट

रत्नागिरी

१) गणपत कदम, रत्नागिरीचे माजी आमदार ठाकरे गट संगमेश्वर, अहिल्यानगर

१) सुभाष बने, संगमेश्वर माजी आमदार ठाकरे गट

नवी मुंबई

१) रमाकांत म्हात्रे, कॅाग्रेस नेते आणि नवी मुंबईचे माजी महापौर

# शिक्रापुरात भरधाव पिकअप उलटून अपघात; एकजण गंभीर जखमी, चालक फरार

**शिक्रापूर । प्रतिनिधी**

शिक्रापूर (ता.शिरुर) येथील पुणे-नगर महामार्गालगत असलेल्या बजरंगवाडी येथे भरधाव पिकअपचा भीषण अपघात झाला. यामध्ये पिकअप रस्त्याच्या विरुद्ध बाजूला जाऊन उलटून एकजण गंभीर जखमी झाला. याप्रकरणी अज्ञात पिकअप चालकविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




शिक्रापूर (ता.शिरुर) येथील पुणे-नगर महामार्गावरून रात्रीच्या सुमारास (एमएच १४ जेएल ३२४०) पिकअप भरधाव वेगाने अहमदनगर बाजूने पुण्याच्या दिशेने जात असताना पिकअप चालकाचे नियंत्रण सुटल्याने पिकअप भरधाव वेगाने रस्त्याच्या विरुद्ध बाजूला जाऊन रस्त्याचे कडेला उलटला. यावेळी सदर रस्त्याच्या कडेला असलेल्या अतुल नाणेकर यांना पिकअपची धडक बसून ते जमिनीवर पडून गंभीर जखमी झाले. तर पोलीस व नागरिकांनी सदर जखमी पिकअप चालकाला रुग्णालयात हलवले.

त्यानंतर उलटलेला पिकअप सरळ करत बाजूला केला. याबाबत सोमनाथ लक्ष्मण सांडभोर (वय ३४, रा. बजरंगवाडी शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी या पिकअपवरील अज्ञात चालकावर गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस हवलदार हनुमंत गिरमकर हे करत आहेत.

बस उलटून अपघात; १७ प्रवासी जखमी

दुसऱ्या घटनेत, लग्नाचे वऱ्हाड घेऊन निघालेली खासगी प्रवासी बस उलटून अपघात झाला. या अपघातात १७ प्रवासी जखमी झाले आहेत. ही घटना रविवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास मुंबई-नाशिक महामार्गावरील कसाराखुर्द गाव हद्दीत घडली. हे वऱ्हाड मुंबई-कुलाबा येथून नाशिक जिल्ह्यातील सिन्नर या ठिकाणी जाताना हा अपघात घडला.

राज्यातील अनेक भागातून अपघाताच्या घटना उघडकीस

राज्यातील वेगवेगळ्या भागातून अपघाताच्या घटना उघडकीस येत आहेत. अशातच आता एसटी बसच्या धडकेत ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाल्याची घटना रास्ता पेठेत घडली आहे. याप्रकरणी एसटी बस चालकाविरुद्ध समर्थ पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. व्यंकट रामण (वय ७४, रा. वैष्णवी अपार्टमेंट, रास्ता पेठ) असे मृत्युमुखी पडलेल्या ज्येष्ठ नागरिकाचे नाव आहे. याप्रकरणी एसटी बसचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सिंहगड रस्ता भागात दुचाकी चोरट्यांना पकडले; पाच दुचाकींसह लॅपटॉप जप्त

पुणे : राज्यात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, राज्यातील वेगवेगळ्या भागातून चोरीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता सिंहगड रोड परिसरात संशयास्पद फिरत असताना दोन दुचाकी चोरट्यांना पोलिसांनी जेरबंद केले आहे. चौकशीतून या दोघांकडून पोलिसांनी ५ दुचाकी आणि १ रिक्षा तसेच लॅपटॉप जप्त केला आहे. सिंहगड रोड पोलिसांनी ही कारवाई केली आहे

सोपान रमेश तोंडे (वय २७, रा. मुळशी, जि. पुणे), आकाश सुनील नाकाडे (वय २९, सध्या रा. नाईक आळी, धायरी, मूळ रा. बार्शी, जि. सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. वरिष्ठ निरीक्षक दिलीप दाईंगडे, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उत्तम भजनावळे, सहायक निरीक्षक सचिन निकम, उपनिरीक्षक संतोष भांडवलकर यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

तोंडे आणि नाकाडे सराइत चोरटे आहेत. सिंहगड रस्ता परिसरातून त्यांनी दुचारी चोरली होती. आरोपी तोंडे व नाकाडे बाह्यवळण मार्गवरील नवले पूल परिसरातून वडगावकडे निघाले होते. वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी हद्दीत सिंहगड पोलिसांचे पथक गस्त घालत होते. तेव्हा गस्त घालणारे पोलीस कर्मचारी देवा चव्हाण, सागर शेंडगे यांना त्यांच्या बातमीदाराकडून एक संशयित फिरत असल्याची माहिती मिळाली. त्यानूसार, पथकाने नवले पूल परिसरात सापळा लावून दोघांना पकडले. त्यांची चौकशी केली. चौकशीत त्यांनी दुचाकी चोरीची कबुली दिली. तपासात दोघांनी पाच दुचाकी, लॅपटॉप, कॅमेरा चोरीची कबुली दिली. तोंडे, नाकाडे यांच्याकडून पाच दुचाकी, रिक्षा, लॅपटॉप, कॅमेरा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



अल्पवयीनांकडून दोन दुचाकी जप्त

मौजमजेसाठी दुचाकी चोरणाऱ्या दोन अल्पवयीनांना भारती विद्यापीठ पोलिसांनी पकडले. त्यांच्याकडून दोन दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. भारती विद्यापीठ परिसरात तपास पथकातील पोलीस कर्मचारी मितेश चोरमोले, सागर बोरगे, अभिनय चौधरी गस्त घालत होते. तेव्हा अल्पवयीन मुलांबाबत माहिती मिळाली. सापळा लावून त्यांना पकडले. दोघांनी दुचाकी चोरीची कबुली दिली. त्यांच्याकडून दोन दुचाकी जप्त केल्या असून, वरिष्ठ निरीक्षक सावळराम साळगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई केली.

कारची काच फोडून चोरी

राज्यात चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे. राज्यातील वेगवेगळ्या भागातून चोरीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता पुण्यातील विमाननगर परिसरात रस्त्याच्या कडेला लावलेल्या कारची काच फोडून चोरट्यांनी तब्बल दहा लाख ५१ हजार रुपयांची रोकड चोरुन नेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. व्यावसायिकाने याबाबत तक्रार दिली असून, या चोरट्यांनी पाळत ठेवून चोरी केल्याचा संशय आहे. याप्रकरणी नितेशकुमार राजकुमार शहा (वय ३४, रा. चारकोप, कांदिवली, मुंबई) यांनी विमानतळ पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानूसार चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, शहा व्यावसायिक आहेत. ते कामानिमित्त मुंबईहून विमाननगर येथे आले होते. तेव्हा विमाननगर भागातील वाटिका सोसायटीसमोर त्यांनी रविवारी रात्री कार लावली. नंतर ते कामाच्या ठिकाणी गेले. त्यावेळी चोरट्यांनी कारची काच फोडली. कारमधील पिशवीत ठेवलेली साडेदहा लाखांची रोकड चोरुन पोबारा केला. घटना लक्षात येताच त्यांनी पोलिसांकडे धाव घेऊन तक्रार दिली.